दैनिक
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ६ वे अंक -२६९ सोमवार दि.०८ जुन २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४
Beed Daily Marathi Year-6th Issue-269 Monday, Dt.08 June 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# खाद्यपदार्थ वर्तमानपत्रात गुंडाळता येणार नाहीत



मुंबई : प्रतिनिधी

खाद्य पदार्थ वर्तमानपत्रात गुंडाळून विकणा-यांवर आता कारवाई होणार आहे. खाद्य पदार्थ वर्तमानपत्रात गुंडाळून विकू नका, असे आदेश अन्न आणि औषध प्रशासनाने आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिले. त्यामुळे आता वर्तमानपत्रात गुंडाळून खाद्य पदार्थ विकता येणार नाहीत. खरे तर याबाबतचा निर्णय अगोदरपासूनच आहे. पण आता या निर्णयाची कडक अंमलबजावणी होणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

खाद्य विक्रेते, पनीर विक्रेते, औषध विक्रेते, गुटखा आणि पान मसाला विक्रेते आता अन्न आणि औषध प्रशासनाच्या रडारवर आले आहेत. वर्तमानपत्राच्या छपाईसाठी वापरल्या जाणा-या शाईत शिसे, झिंक आणि कॅडमियन असते. ते आरोग्यास घातक असते. त्यामुळे वर्तमानपत्रातून खाद्यपदार्थ विकण्यास बंदी घालण्यात आली आहे. त्यामुळे खाद्य पदार्थ विक्री करणा-यांना वडापाव, भजीपाव, समोरा, सँडवीच हे बटर पेपर किंवा सिल्व्हर फाईलमध्ये द्यावे लागणार आहेत.

राज्यात अन्न व औषध प्रशासन विभागाची प्रतिबंधित गुटखा, पानमसाला व तत्सम अन्नपदार्थांविरुद्धची विशेष मोहीम प्रभावीपणे सुरू आहे. १ ते ५ जून २०२६ या कालावधीत करण्यात आलेल्या कारवाईत तब्बल १९२ व्यक्तींना अटक करण्यात आली आहे. या पाच दिवसांच्या कालावधीत राज्यभर १९५ धाडी टाकण्यात आल्या असून या कारवाईत १ कोटी ९९ लाख १८ हजार ४७५ रुपयांचा प्रतिबंधित साठा जप्त करण्यात आला अशी माहिती अन्न व औषध प्रशासनाने दिली. अवैध उत्पादन, साठवणूक, वाहतूक व विक्रीस आळा घालण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाकडून कठोर कारवाई करण्यात येत आहे.प्रतिबंधित अन्नपदार्थविरोधी मोहिमेत ३ जून २०२६ रोजी सोनगीर, जि. धुळे येथे टाकलेल्या धाडीत २३ लाख ५० हजार रुपयांचा प्रतिबंधित साठा जप्त करण्यात आला. ४ जून रोजी समृद्धी महामार्गावर सावंगी टोल नाका येथे ६० लाख ५० हजार रुपये किंमतीचा प्रतिबंधित साठा आणि वाहन तर नांदेड येथे १७ लाख ५२ हजार ४५० रुपये किंमतीचा प्रतिबंधित साठा आणि वाहन जप्त करण्यात आले. तसेच मोशी, पिंपरी-चिंचवड येथे ६ लाख १९ हजार ९८२ रुपये किंमतीचा प्रतिबंधित साठा जप्त करून गुन्हा दाखल केला. याशिवाय अन्यत्र धडक मोहीम राबविण्यात आली.

प्रतिबंधित अन्नपदार्थ विरोधात व्यापक मोहीम

भारतीय न्याय संहिताचे कलम १२३, २२३, २७४, २७५ तसेच अन्न सुरक्षा मानके कायद्याचे कलम २६, २७, ३०(२) आणि कलम ५९ अंतर्गत गुन्हे दाखल करून आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार प्रतिबंधित अन्नपदार्थांविरुद्ध व्यापक मोहीम राबविण्यात येत आहे.

## देवस्थान इनाम जमीन कायद्याचा मसुदा स्थगित; हिवाळी अधिवेशनात सुधारित विधेयक आणणार

महसूलमंत्री बावनकुळेंची घोषणा

अंबाजोगाई-प्रतिनिधी :--

नागपूर येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ६ जून रोजी देवस्थान इनाम जमीन निर्मूलन कायद्याचा प्रारूप मसुदा तूर्तास स्थगित करण्याची महत्त्वपूर्ण घोषणा केली. राज्यातील सुमारे ५.५ लाख हेक्टर देवस्थान जमिनींवरील अतिक्रमणे रोखणे, प्रभावशाली व्यक्तींचा ताबा हटवणे आणि देवस्थानांचे हक्क पुन्हा प्रस्थापित करणे या उद्देशाने महसूल विभागाने स्वतंत्र कायदा आणण्याची तयारी सुरू केली होती. या कायद्याचा प्रारूप मसुदा ६ मे रोजी सार्वजनिक करून त्यावर ५ जूनपर्यंत नागरिकांकडून सूचना व हरकती मागवण्यात आल्या होत्या. मात्र, या मसुद्यावर मोठ्या प्रमाणात आक्षेप नोंदवण्यात आल्याने तसेच देवस्थाने आणि हिंदुत्ववादी संघटनांमध्ये संभ्रम निर्माण झाल्याने सरकारने हा मसुदा स्थगित करून प्रत्येक आक्षेपावर सखोल सुनावणी घेण्याचा निर्णय घेतला आहे.



या कायद्याच्या पुनर्रचनेसाठी आणि प्राप्त आक्षेपांचे निवारण करण्यासाठी महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखाली एका विशेष समितीची स्थापना करण्यात येणार आहे. या उच्चस्तरीय समितीत २ विभागीय आयुक्त, २ जिल्हाधिकारी, ३ उपसचिव आणि १५ देवस्थान प्रतिनिधींचा समावेश असेल, तसेच देवस्थानांसाठी न्यायालयात लढा देणाऱ्या कायदेतज्ज्ञांनाही यात स्थान दिले जाईल. ही समिती १५ ऑगस्टपर्यंत प्राप्त हरकतींवर सुनावणी पूर्ण करेल आणि १५ सप्टेंबरपर्यंत नवीन सुधारित मसुदा तयार करण्याचे नियोजन आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून मिळालेल्या या जमिनींपैकी अनेक जमिनींवर कूळ कायदा लागू असून काही ठिकाणी दीर्घकाळापासून वहिवाट सुरू आहे. ज्या जमिनी १०० किंवा २०० वर्षांपासून देवस्थानांच्या प्रत्यक्ष ताब्यात नाहीत, त्यांच्याबाबत स्वतंत्र आणि कायदेशीर मार्ग शोधला जाईल, असे महसूलमंत्र्यांनी स्पष्ट केले. काही जमिनी सरसकट देवस्थानांना परत देता येतील, तर काही प्रकरणांत वेगळा मार्ग शोधावा लागेल. कोणत्याही परिस्थितीत देवस्थानांचे हक्क सुरक्षित ठेवणारा आणि साडेपाच लाख हेक्टर जमिनींचे संरक्षण करणारा सुधारित कायदा आगामी डिसेंबरमधील हिवाळी अधिवेशनात मांडण्याचा सरकारचा निर्धार आहे.

## आरटीओला बनावट पीयूसीची माहिती दिल्याच्या संशय: तरुणाला बेदम मारहाण

माजलगाव: आरटीओ अधिकाऱ्याला बनावट पीयूसी केंद्र चालवत असल्याची माहिती दिल्याचा संशय घेऊन एका तरुणाला लाकडी दांड्याने बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना माजलगाव शहरातील केकाडी महाराज चौकात घडली आहे. याप्रकरणी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात चार जणांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी आशिष जितेंद्र शर्मा (वय २६, रा. जिजामाता नगर, माजलगाव) हा पीयूसी केंद्र चालवून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. पूर्वी तो आणि त्याचा मित्र करण परमेश्वर मेंडके (रा. जिजामाता नगर) हे दोघे मिळून माजलगावात पीयूसी केंद्र चालवायचे. सध्या करण हा परभणी फाटा येथे स्वतंत्र पीयूसी केंद्र चालवतो. घटनेच्या दिवशी आशिष गावी आला असता, त्याला भेटण्यासाठी करण मेंडके, विजय जीवन जाधव, मोहन मस्के आणि प्रशांत राऊत हे आले होते. हे सर्वजण सायंकाळच्या सुमारास केकाडी महाराज चौकातील एका चहाच्या हॉटेलवर गेले.

त्या ठिकाणी करण मेंडके याने आशिषला 'तू आरटीओ अधिकाऱ्याला मी बनावट पीयूसी तयार करत असल्याची माहिती का दिलीस?' अशी विचारणा करत शिवीगाळ सुरू केली. आशिषने नकार दिला असता, करणने त्याचे साथीदार विजय, मोहन आणि प्रशांत यांना लाकडी दांडे आणण्यास सांगितले. त्यानंतर करणने लाकडी दांड्याने आशिषच्या डाव्या कानावर मारून गंभीर दुखापत केली. तसेच इतर तिघांनी लाकडी दांड्याने आशिषच्या उजव्या पायावर, गुडघ्यावर आणि डाव्या हाताच्या मनगटावर बेदम मारहाण करून मुका मार दिला. आशिषचा मित्र असीम अतार याने मध्यस्थी करत भांडण सोडवले. जखमी आशिषवर संजीवनी हॉस्पिटलच्या अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला असून पोलीस शिपाई नितीन सोनवणे पुढील तपास करत आहेत.

## घरगुती एलपीजी सिलेंडर २९ रुपयांनी महागला

नवी दिल्ली ।प्रतिनिधी

७ जून रोजी केंद्र सरकारकडून घरगुती एलपीजी गॅस सिलेंडरच्या दरात २९ रुपयांची मोठी वाढ जाहीर करण्यात आली आहे. यामुळे आधीच महागाईने होरपळणाऱ्या सामान्य नागरिकांच्या स्वयंपाकाचे बजेट पूर्णपणे कोलमडणार आहे.

पश्चिम आशियातील वाढत्या संघर्षांमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर कच्च्या तेलाच्या आणि इंधनाच्या किंमती भडकल्याने देशातील सरकारी तेल कंपन्यांना मोठा आर्थिक तोटा सहन करावा लागत होता. हा तोटा अंशतः भरून काढण्यासाठी केंद्र सरकारने हा दरवाढीचा निर्णय घेतला आहे.या नव्या दरवाढीमुळे १४.२ किलोच्या घरगुती गॅस सिलेंडरची किंमत दिल्लीत ९१३ रुपयांवरून ९४२ रुपये, तर मुंबईत ती ९४१ रुपये ५० पैशांवर पोहोचली आहे. गेल्या तीन महिन्यांत झालेली ही दुसरी मोठी दरवाढ आहे. यामुळे दोन वेळच्या जेवणाची चिंता असलेल्या सर्वसामान्य कुटुंबांवर कमालीचा आर्थिक ताण पडणार असून देशात तीव्र असंतोष पसरत आहे.

## १५ जूनपर्यंत राज्यात मान्सूनच्या पावसाची शक्यता कमी, पेरणीची घाई करु नका..!

मान्सून कोकणात दाखल झाला, पण सर्वदूर सक्रिय नाही..!!

मुंबई ।प्रतिनिधी

मान्सून दक्षिण कोकणात दाखल झाला असून सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यांतील काही भागांमध्ये ९ जूनपर्यंत मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज आहे. मात्र त्यानंतर किमान १५ जूनपर्यंत राज्यातील पावसाचा एकंदरीत जोर तसेच मान्सूनच्या प्रगतीचा वेग कमी होण्याची शक्यता हवामानाच्या सध्याच्या अंदाजातून दिसून येत आहे. त्यामुळे या कालावधीत राज्यात सर्वत्र समाधानकारक पावसाची शक्यता कमी आहे.

सध्याच्या हवामान अंदाजानुसार किमान १५ जूनपर्यंत विदर्भ, मराठवाडा, खानदेश, आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागांमध्ये दुपारनंतर ढग आणि विखुरलेल्या स्वरूपाचा मेघगर्जनेसह वादळी पाऊस पडण्याची शक्यता आहे. तथापि, हा पाऊस व्यापक क्षेत्रात पेरणीस पोषक ठरेल, अशी परिस्थिती अद्याप दिसत नाही.

दरम्यान, किमान १२ जूनपर्यंत राज्यातील अनेक भागांमध्ये कमाल तापमान सध्याप्रमाणेच उच्च राहण्याची शक्यता आहे. विदर्भ व खानदेशात कमाल तापमान ४० अंश सेल्सिअसपेक्षा अधिक, तर मराठवाड्यात ३५ ते ४० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याचा अंदाज आहे.

शेतकरी व नागरिकांना आवाहन

आगामी वादळी पावसावर अवलंबून राहून पेरणीची घाई करू नये., विजांच्या कडकडाटाच्या वेळी झाडाखाली, टिनशेडखाली तसेच विद्युत ट्रान्सफॉर्मर, वीज खांब आणि विद्युत वाहिन्यांच्या जवळ थांबणे टाळावे.

## सौ.शितल पाटील जोशी यांना डॉक्टरेट पदवी प्रदान

बीड ।प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या कला विद्याशाखे अंतर्गत इंग्रजी विषयात सौ. शीतल सुशील पाटील (सौ. शीतल लक्ष्मण जोशी) यांनी कॉन्फ्लिक्ट बिट्विन नेचर अँड मॅन इन द सिलेक्ट वर्क्स ऑफ अमिताव घोषळ या विषयावर संशोधन पूर्ण करून विद्यावाचस्पती (झह.ऊ.) पदवी संपादन केली आहे.

सौ. शीतल सुशील पाटील (कु. शीतल लक्ष्मण जोशी) यांच्या संशोधन कार्यास डॉ. मनोज एल. सोमवंशी, शंकरराव जावळे पाटील महाविद्यालय, लोहरा, जि. धाराशिव येथील प्राध्यापक यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. संशोधनामध्ये प्रख्यात साहित्यिक अमिताव घोष यांच्या निवडक साहित्यकृतींच्या माध्यमातून निसर्ग आणि मानव यांच्यातील संघर्ष, पर्यावरणीय संकटे, हवामान बदलाचे परिणाम आणि मानवी हस्तक्षेपामुळे निर्माण होणाऱ्या आव्हानांचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे.



सौ. शीतल सुशील पाटील (कु. शीतल लक्ष्मण जोशी) यांनी प्राप्त केलेल्या या उल्लेखनीय शैक्षणिक यशाबद्दल शिक्षण क्षेत्रातील मान्यवर, मित्रपरिवार, नातेवाईक तसेच सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींनी त्यांचे अभिनंदन केले आहे. त्यांच्या या यशामुळे संशोधन क्षेत्रात कार्य करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना निश्चितच प्रेरणा मिळणार आहे.सौ. शीतल सुशील पाटील (कु. शीतल लक्ष्मण जोशी) यांना पीएच.डी. पदवी प्राप्त झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन व पुढील शैक्षणिक वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा.!




## माजलगाव तालुक्यातील ग्रामसेवक तलाठी यांच्या कडून सामान्य नागरिकांची आर्थिक लूट ?

माजलगाव / विजय कापसे

माजलगाव तालुक्यातील अनेक तलाठी ग्रामसेवक सामान्य नागरिकांची आर्थिक लूटमार करत आहेत.याची वरिष्ठांनी दखल घेऊन दोषी विरुद्ध कारवाई करावी अशी मागणी सामान्य जनतेतून होत आहे.



काही ग्रामसेवक फेरओढण्यासाठी पाच ते दहा हजाराची मागणी करताना दिसत आहेत.तसेच ग्रामपंचायतचे नाहरकत काढण्यासाठी एक हजार रुपये घेतले जातात. खेड्या पाड्यावरून नागरिक त्यांच्या कामासाठी ग्रामसेवकका कडे तलाठी कडे येतात तेंव्हा यांचे ऑफिस बंद असतात. नागरिक दिवसभर त्यांच्या ऑफीसला येरझऱ्या घालतात. नाहरकत काढण्यासाठी ग्रामसेवक एक हजार रुपये घेतो आणि ते देखील ग्रामसेवक पावती न देता स्वतःच्या फोन पे वर घेतात. अश्याप्रकारे सामान्य गरीब नागरिकांची लूट हे लोक करत आहेत. याकडे तालुक्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष घालून हा लूटमारीचा धंदा वेळीच थांबवा अन्यथा जनतेला रस्त्यावर उतरायला वेळ लागणार नाही. असा इशारा तालुक्यातील सामान्य जनतेने दिला आहे.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

# मराठवाडा तहानला, सरकार झोपले ?

## टँकरराजमुळे जनतेचा आक्रोश, पाणी हक्क अभियानची आक्रमक हाक

जालना / शेख फारुक

मराठवाड्यातील भीषण पाणीसंकट दिवसेंदिवस अधिकच गंभीर होत असताना राज्य सरकार आणि प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात संतापाची लाट उसळू लागली आहे. महाराष्ट्र जलधोरणातील तरतुदी कागदावरच राहिल्याने मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये टँकरराज सुरू झाले असून लाखो नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी जीवघेणा संघर्ष करावा लागत असल्याचा आरोप मूव्हमेंट फॉर पीस अँड जस्टिस फॉर वेल्फेअर चझग या संघटनेने केला आहे.

सलग अपुऱ्या पावसामुळे भूजल पातळीतील मोठी घसरण आणि रखडलेल्या पाणीपुरवठा योजनांमुळे मराठवाडा अभूतपूर्व जलसंकटाच्या खाईत ढकलला गेला आहे. अनेक गावांतील विहिरी,बोअरवेल आणि जलस्रोत कोरडे पडले असून नागरिकांना दररोज अनेक किलोमीटर अंतरावरून पाणी आणण्याची वेळ आली आहे.मूव्हमेंट फॉर पीस ड जस्टीस

(चझग)च्या वरिष्ठ पदाधिकारी अझीम परारा यांनी प्रशासनावर थेट निशाणा साधताना सांगितले की भारतीय संविधानातील कलम २१ प्रत्येक नागरिकाला जीवनाचा मूलभूत अधिकार देते. स्वच्छ आणि सुरक्षित पिण्याचे पाणी हा त्या अधिकाराचाच अविभाज्य भाग आहे. मात्र महाराष्ट्र जलधोरणात स्पष्ट तरतुदी असतानाही नागरिकांना आवश्यक प्रमाणात पाणी उपलब्ध करून देण्यात प्रशासन सपशेल अपयशी ठरले आहे.त्यांनी सांगितले की






राज्याच्या जलधोरणानुसार ग्रामीण भागात प्रति व्यक्ती प्रतिदिन किमान ५५ लिटर तर शहरी भागात १३५ लिटर सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे सरकारची जबाबदारी आहे. परंतु प्रत्यक्षात अनेक गावांमध्ये आठवड्यातून एकदाच पाणीपुरवठा होत असून नागरिकांना टँकरच्या भरोशावर जगावे लागत आहे.लातूरसह मराठवाड्यातील अनेक भागांमध्ये टँकरची संख्या झपाट्याने वाढत आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना आणि धाराशिव जिल्ह्यांतील शेकडो गावे तीव्र पाणीटंचाईच्या विळख्यात अडकली आहेत.

छत्रपती संभाजीनगर शहरातील अनेक वस्त्यांमध्ये नियमित पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिकांचे हाल होत आहेत. जालना जिल्ह्यात तब्बल ९३ टँकरद्वारे ९६ पेक्षा अधिक गावांना पाणीपुरवठा केला जात असल्याची माहिती संघटनेने दिली आहे.पाणी हा कोणाचाही उपकार नसून प्रत्येक नागरिकाचा मूलभूत मानवी हक्क असल्याचा पुनरुच्चार करत मूव्हमेंट फॉर पीस ड जस्टीस (चझग) ने राज्य सरकारला तातडीने जागे होण्याचे आवाहन केले आहे. अपूर्ण पाणीपुरवठा योजना युद्धपातळीवर पूर्ण कराव्यात, टँकर व्यवस्थेतील त्रुटी दूर कराव्यात आणि प्रत्येक नागरिकाला सुरक्षित पुरेसे व नियमित पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे अशी मागणी संघटनेने केली आहे.

दरम्यान वाढत्या जलसंकटाच्या पार्श्वभूमीवर मूव्हमेंट फॉर पीस ड जस्टीस (चझग) ने राज्यभर पाणी हक्क अभियान सुरू केले असून नागरिकांना त्यांच्या पाणी हक्कांविषयी जागरूक करण्यासह प्रशासनावर लोकदबाव निर्माण करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

मराठवाड्याची तहान भागविण्यासाठी केवळ घोषणा नव्हे तर ठोस कृती हवी असा इशाराही संघटनेने सरकारला दिला आहे. जनतेच्या सहनशक्तीचा अंत पाहू नका अन्यथा पाण्यासाठीचा हा आक्रोश मोठ्या जनआंदोलनात परिवर्तित होईल असा स्पष्ट इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

संपादकीय....

# नीट प्रणाली बदलणार

नवी दिल्ली : नीट-यूजी २०२६ पेपरफुटी आणि उइरए च्या मार्किंगमधील गोंधळानंतर सरकार परीक्षा व्यवस्थेत मोठे बदल करण्याच्या तयारीत आहे. एनटीए अशी नवीन प्रणाली तयार करण्यावर काम करत आहे, ज्यामध्ये प्रश्न तयार करणा-या तज्ज्ञांनाही ते कोणत्या परीक्षेचे प्रश्नपत्रिका बनवत आहेत हे कळणार नाही.

नवीन योजनेनुसार, वेगवेगळ्या विषयांचे तज्ज्ञ फक्त प्रश्न तयार करतील. हे प्रश्न एका मोठ्या डिजिटल बँकेत ठेवले जातील. अधिका-यांच्या मते, यात सुमारे १० हजार प्रश्न असू शकतात. नंतर तंत्रज्ञानाच्या मदतीने या प्रश्नांमधून अंतिम परीक्षेची प्रश्नपत्रिका तयार केली जाईल. केंद्रीय संसदीय कार्य मंत्री किरण रिजिजू म्हणाले पेपरफुटी प्रकरणात शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारली आहे. मंत्री जबाबदारीपासून पळ काढत नाहीत, तर व्यवस्था सुधारण्यासाठी सातत्याने पावले उचलत आहेत.

एनटीएशी संबंधित अधिका-याने म्हटले आहे की, आम्ही इच्छितो की संपूर्ण प्रश्नपत्रिकेची माहिती खूप कमी लोकांपर्यंत पोहोचावी. प्रणालीने लोकांवर नाही, तर प्रक्रियेवर विश्वास ठेवला पाहिजे. पेपरफुटी प्रकरणात भाषांतर करणा-यांच्या अटकेनंतर एनटीए भाषांतर प्रक्रियेतही बदल करू इच्छित आहे. एजन्सीने यापूर्वीच सर्वोच्च न्यायालयाला सांगितले आहे की, ती सुमारे ८५% भाषांतराचे काम एआय(कृत्रिम बुद्धिमत्ता) द्वारे करण्याची योजना आखत आहे. यानंतर, तज्ज्ञ फक्त हे तपासतील की भाषांतर योग्य झाले आहे की नाही. अधिका-यांचे म्हणणे आहे की, भाषांतर करणा-यांना ते कोणत्या परीक्षेचे प्रश्न पाहत आहेत याची माहिती नसावी, असाही प्रयत्न केला जाईल.

आगामी परीक्षेची तयारी सुरू

एनटीए सध्या २१ जून रोजी होणा-या नीट-यूजी टेस्टची तयारी करत आहे. अधिका-यांच्या मते, काही बदल आतापासूनच लागू करण्यात आले आहेत. या अंतर्गत नवीन विषय तज्ज्ञांना जोडण्यात आले आहे. त्याचबरोबर, पेपर छापल्यानंतर त्याच्या वाहतूक आणि साठवणूक प्रणालीला अधिक सुरक्षित

बनवण्यावरही काम सुरू आहे.

शिक्षणमंत्र्यांवर थेट आरोप असल्यास राजीनामा मागा

रिजिजू म्हणाले की, लाखो विद्यार्थ्यांना नीट पुन्हा देण्याची वेळ आली आणि सीबीएसईच्या मार्किंगमधील चुकांमुळेही त्रास झाला. अशा प्रकरणांमध्ये, सरकारची जबाबदारी समस्या सोडवणे आहे, त्यापासून पळ काढणे नाही. त्यांनी विश्वास व्यक्त केला की उचललेली पाऊले भविष्यात अशा घटनांना रोखण्यास मदत करतील. ते म्हणाले की एखाद्या मंत्री किंवा त्याच्या कर्मचा-यांवर थेट भ्रष्टाचार, लाचखोरी किंवा गैरकृत्याचा आरोप असल्यास राजीनाम्याची मागणी योग्य ठरते, परंतु नीट पेपर लीक प्रकरणात शिक्षणमंत्र्यांवर असा कोणताही थेट आरोप नाही. सीबीएसई आणि एनटीए स्वतंत्र संस्था आहेत. त्यांच्या दैनंदिन कामकाजावर मंत्री थेट लक्ष ठेवत नाहीत. त्यामुळे, एखाद्या संस्थेतील गैरव्यवहार आणि मंत्र्यांच्या वैयक्तिक वर्तणुकीतील फरक समजून घेणे महत्त्वाचे आहे.

सीबीएसई री-एक्झामचा पेपर लीक झाला नाही

सीबीएसई २०२६ री-एक्झामपूर्वी सोशल मीडिया आणि मेसेजिंग ॲप्सवर पेपर लीक झाल्याचे आणि प्रश्न आधीच मिळाल्याचे अनेक दावे केले जात आहेत. एनटीएने हे सर्व दावे चुकीचे आणि दिशाभूल करणारे असल्याचे म्हटले आहे. एजन्सीचे म्हणणे आहे की काही ठग टोळ्या विद्यार्थी आणि त्यांच्या कुटुंबीयांना दिशाभूल करून पैसे कमवण्याचा प्रयत्न करत आहेत. सोशल मीडियावर व्हायरल होत असलेले कथित पेपर आणि लीकशी संबंधित मेसेज पूर्णपणे बनावट आहेत. एनटीएने सांगितले की परीक्षेच्या सुरक्षिततेसाठी सर्व आवश्यक व्यवस्था करण्यात आल्या आहेत आणि परीक्षा निष्पक्षपणे घेतली जाईल. एजन्सीने विद्यार्थ्यांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आणि आपल्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन केले आहे. तसेच, असे बनावट संदेश आणि पोस्ट पसरवणारे खाती आणि चॅनेल ओळखले जात आहेत. एनटीए त्यांची माहिती सोशल मीडिया कंपन्या आणि सायबर क्राईम एजन्सींना देत आहे, जेणेकरून त्यांना काढून टाकता येईल. एजन्सीने अशा प्रकरणांमध्ये कायदेशीर कारवाईसाठी तक्रार देखील दाखल केली आहे.




सावळदबारा - भोकरदन येथे माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांचा येथोचित सत्कार भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांनी केला.

# संतविचारांचा दीप गावागावात पोहोचवणारे कीर्तनकार समाजाचे खरे वैभव- भास्करराव अंबेकर

जालना / शेख फारुक

संतांच्या अभंगातील जीवनमूल्ये,माणुसकीचा संदेश आणि समाजप्रबोधनाची परंपरा गावागावात पोहोचवणारे कीर्तनकार हे समाजाचे खरे वैभव असून आजच्या विभाजित आणि स्वार्थी वातावरणात संतविचारांची नितांत गरज असल्याचे प्रतिपादन शिवसेना संपर्कप्रमुख तथा माजी नगराध्यक्ष भास्करराव अंबेकर यांनी केले.

हभप प्रा.डॉ.अनिरुद्ध महाराज क्षीरसागर उर्फ नित्यानंद स्वामी यांच्या ६२ व्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त श्रीक्षेत्र मुक्तधाम आश्रम, सावरगाव माळ येथे आयोजित भव्य वारकरी दिंडी सोहळा वारकरी संमेलन आणि आध्यात्मिक संस्कार शिबिराच्या सांगता कार्यक्रमात ते बोलत होते.यावेळी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष पंडितराव भुतेकर,तुकाराम डोंगरे,सागर डोंगरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.अंबेकर म्हणाले की संतांनी रचलेले अभंग हे केवळ धार्मिक साहित्य नसून आनंदी सुसंस्कृत आणि मूल्याधिष्ठित जीवन जगण्याचा मार्ग आहेत. राजकारणातून समाजाचा भौतिक विकास घडतो तर धर्म माणसाला अध्यात्मिक समाधान आणि अंतःशांती प्रदान करतो. वारकरी संप्रदायाने या दोन्हींचा सुंदर समन्वय साधत समाजाला आदर्श



जीवनपद्धती दिली आहे.

संत तुकाराम,संत ज्ञानेश्वर,संत एकनाथ यांसारख्या महान संतांनी आपल्या अभंगातून दिलेले विचार समाजापर्यंत पोहोचविण्याचे महान कार्य हभप डॉ.अनिरुद्ध महाराज क्षीरसागर यांच्यासारखे कीर्तनकार अनेक वर्षांपासून सातत्याने करत आहेत.संतविचारांच्या माध्यमातून समाजाला एकत्र आणण्याचे माणुसकीचे बंध दृढ करण्याचे आणि सकारात्मकतेचा संदेश देण्याचे कार्य हभप डॉ.अनिरुद्ध महाराज क्षीरसागर प्रभावीपणे करत असल्याचे गौरवोद्गार अंबेकर यांनी काढले.या प्रसंगी हभप श्री.प्रेमानंद महाराज देशमुख यांचे भावपूर्ण हरिकीर्तन झाले.कार्यक्रमासाठी आजी-माजी विद्यार्थी,भक्तगण आणि पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. भास्कर शिंदे,नामदेव मुरकुट, पांडुरंग घारे,उद्धव मस्के, प्रभाकर कुहिरे आदींनी कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन केले.

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त 'एक पेड माँ के नाम' उपक्रमांतर्गत वृक्षारोपण

पाटोदा ।प्रतिनिधी

वनपरिक्षेत्र कार्यालय, सामाजिक वनीकरण पाटोदा यांच्या वतीने ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विभागीय वनाधिकारी (सामाजिक वनीकरण विभाग, बीड) लखमावाड तसेच सहाय्यक वनसंरक्षक बिराजदार यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला.

शासनाच्या 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमांतर्गत धस पिंपळगाव येथील माध्यमिक विद्यालय तसेच निरगुडी येथील जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण व्हावी आणि वृक्षांचे महत्त्व पटवून द्यावे या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी सामाजिक वनीकरण पाटोदा विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी बी. पी. मोहळकर, वनरक्षक एस. एस. बडगे, सी. एन. फरताळे, गायकवाड तसेच इतर कर्मचारी, शिक्षक, विद्यार्थी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध सावलीदार, फळझाडे आणि पर्यावरणपूरक वृक्षांची लागवड केली.

कार्यक्रमादरम्यान उपस्थितांना पर्यावरण संरक्षण, वृक्षसंवर्धन आणि जैवविविधतेचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. वाढते प्रदूषण, हवामान बदल आणि तापमानवाढ यांसारख्या गंभीर समस्यांवर मात करण्यासाठी प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन करण्यात आले.

'एक पेड माँ के नाम' या उपक्रमातून विद्यार्थ्यांना आपल्या आईच्या सन्मानार्थ एक वृक्ष लावण्याचा आणि त्याचे जतन करण्याचा




प्रेरणादायी संदेश देण्यात आला. या उपक्रमामुळे परिसर अधिक हिरवागार होण्यास मदत होणार असून पर्यावरण संवर्धनाच्या चळवळीला नवे बळ मिळणार आहे.कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांनी वृक्षांचे संरक्षण व संवर्धन करण्याची शपथ घेतली आणि पर्यावरण रक्षणाचा संकल्प करत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली

# कष्ट,प्रामाणिकपणा,माणुसकी आणि कुटुंबवत्सलतेचा दीपस्तंभ हरपला

## कै.गोपीनाथ बाबुराव फसले पाटील यांच्या स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली

आष्टी ।प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील दौलावडगाव येथील ज्येष्ठ नागरिक, आदर्श शेतकरी, समाजातील सर्वांना आपलेसे वाटणारे प्रेमळ व्यक्तिमत्त्व आणि फसले पाटील परिवाराचे आधारवड म्हणून परिचित असलेले कै. गोपीनाथ बाबुराव फसले पाटील यांच्या निधनाने संपूर्ण परिसरावर शोककळा पसरली आहे. एका शांत, संयमी, कष्टाळू आणि निस्वार्थी व्यक्तिमत्त्वाचा अंत झाल्याची भावना प्रत्येकाच्या मनात निर्माण झाली आहे. त्यांच्या जाण्याने केवळ एका कुटुंबाचा कर्ता पुरुष हरपला नसून गावातील एक ज्येष्ठ मार्गदर्शक, समाजाला जोडून ठेवणारा दुवा आणि माणुसकीची शिकवण देणारा व्यक्ती हरपल्याची भावना व्यक्त होत आहे.

गावातील अनेक पिढ्यांनी कै. गोपीनाथ बाबुराव फसले पाटील यांना जवळून पाहिले होते. त्यांनी आयुष्यभर कोणत्याही प्रकारच्या प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता आपल्या कष्टाच्या बळावर संसार उभा केला. अत्यंत साधी राहणी, उच्च विचारसरणी आणि प्रामाणिक जीवनपद्धती हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रमुख पैलू होते. ग्रामीण भागातील कठीण परिस्थितीत त्यांनी शेतीला जीवनाचे साधन मानून दिवस-रात्र परिश्रम घेतले. उन्हाळ्याची तीव्रता असो, पावसाचे संकट असो किंवा दुष्काळाची झळ असो, त्यांनी कधीही कष्टापासून पळ काढला नाही. आपल्या मेहनतीने आणि जिद्दीने त्यांनी कुटुंबाला स्थैर्य दिले आणि समाजात सन्मानाचे स्थान निर्माण केले.

कै. गोपीनाथ बाबुराव फसले पाटील हे अत्यंत मनमिळावू आणि सर्वांना आपलेसे वाटणारे व्यक्तिमत्त्व होते. गावातील प्रत्येक कुटुंबाशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. कुणाच्या घरी आनंदाचा प्रसंग असो किंवा दुःखाचा क्षण, ते नेहमीच हक्काने उपस्थित राहत असत. त्यांच्या उपस्थितीमुळे अनेकांना मानसिक आधार मिळत असे. गावातील अनेक सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग होता. गावच्या विकासासाठी, सामाजिक ऐक्यासाठी आणि परस्पर सलोखा टिकवून ठेवण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.



त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील सर्वात मोठा गुण म्हणजे माणुसकी. त्यांनी आयुष्यभर माणसं जोडण्याचं काम केलं. नात्यांमध्ये विश्वास, प्रेम आणि सन्मान यांना त्यांनी सर्वोच्च स्थान दिलं. गरजू व्यक्तीला मदतीचा हात देताना त्यांनी कधीही प्रसिद्धीची अपेक्षा ठेवली नाही. त्यामुळेच त्यांच्या निधनानंतर केवळ नातेवाईकच नव्हे तर असंख्य मित्र, सहकारी आणि ग्रामस्थ हळहळ व्यक्त करीत आहेत.

कै. गोपीनाथ बाबुराव फसले पाटील हे कुटुंबासाठी जणू आधारस्तंभच होते. मुलांच्या शिक्षणापासून त्यांच्या भवितव्यापर्यंत प्रत्येक बाबतीत त्यांनी विशेष लक्ष दिले. त्यांनी आपल्या मुलांना केवळ शिक्षणच दिले नाही, तर जीवनमूल्यांचे संस्कारही दिले. प्रामाणिकपणा, कष्टाची तयारी, ज्येष्ठांचा आदर, समाजाविषयीची बांधिलकी आणि माणुसकीची जपणूक ही मूल्ये त्यांनी आपल्या कुटुंबात रुजवली. आज त्यांचा परिवार समाजात मानाने उभा आहे, त्यामागे त्यांच्या आयुष्यभराच्या कष्टांची आणि संस्कारांची मोठी शिदोरी आहे.

त्यांच्या पश्चात पत्नी गंगाभागीरथी सरस्वती गोपीनाथ फसले, कन्या सौ. शैलजा रावसाहेब मोरे व सौ. कल्पना भास्कर परभणे, पुत्र बापूसाहेब गोपीनाथ फसले, लहू गोपीनाथ फसले, अंकुश गोपीनाथ फसले, बंधू रंगनाथ रघुनाथ फसले, नातवंडे, जावई, सुना, पुतणे, नातेवाईक आणि मोठा मित्रपरिवार असा विस्तृत परिवार आहे. त्यांच्या निधनामुळे संपूर्ण परिवार दुःखाच्या छायेत असून सर्वत्र शोक व्यक्त केला जात आहे.

कै. गोपीनाथ बाबुराव फसले पाटील यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सोमवार दि. ८ जून २०२६ रोजी सकाळी ८ वाजता अमरधाम, दौलावडगाव, ता. आष्टी, जि. बीड येथे दशक्रिया विधीचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक कार्यक्रमास नातेवाईक, मित्रमंडळी, हितचिंतक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. यावेळी सुप्रसिद्ध कीर्तनकार व प्रवचनकार ह.भ.प. बबन महाराज मगर सर (देऊळगावकर) यांचे प्रवचन होणार असून त्यांच्या मार्गदर्शनातून अध्यात्म, जीवनाचे तत्त्वज्ञान आणि मानवधर्म यांचा संदेश दिला जाणार आहे.

आज कै. गोपीनाथ बाबुराव फसले पाटील आपल्यात नसले तरी त्यांनी आपल्या आयुष्यभर जपलेली माणुसकी, कष्टाची परंपरा, समाजसेवेची भावना आणि कुटुंबप्रेमाचा वारसा कायम जिवंत राहणार आहे. त्यांच्या आठवणी प्रत्येकाच्या मनात कायमस्वरूपी कोरल्या गेल्या आहेत. गावातील एखाद्या वडाच्या झाडाप्रमाणे त्यांनी अनेकांना सावली दिली, आधार दिला आणि योग्य दिशा दाखवली. त्यामुळेच त्यांच्या निधनानंतर आपला माणूस गेला ही भावना प्रत्येकाच्या ओठांवर उमटत आहे.

आज त्यांच्या स्मृतींना उजाळा देताना त्यांच्या सहवासातील असंख्य आठवणी डोळ्यांसमोर उभ्या राहतात. त्यांच्या चेहऱ्यावरचे साधेपण, बोलण्यातला आपुलकीचा सूर, वागण्यातला प्रामाणिकपणा आणि प्रत्येकाला सन्मानाने वागवण्याची वृत्ती कायम स्मरणात राहील. त्यांचे जीवन हे संघर्षातून यश मिळविण्याचा आणि माणुसकी जपत आयुष्य जगण्याचा आदर्श नमुना म्हणून पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी राहील.

देह नश्वर असला तरी कर्तृत्व अमर असते या उक्तीप्रमाणे कै. गोपीनाथ बाबुराव फसले पाटील यांचे कार्य, त्यांचे विचार आणि त्यांनी दिलेले संस्कार हेच त्यांच्या स्मृतींचे खरे स्मारक ठरणार आहे. त्यांच्या पवित्र स्मृतीस समस्त फसले पाटील परिवार, नातेवाईक, मित्रपरिवार, ग्रामस्थ आणि सर्व हितचिंतकांच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे. ईश्वर त्यांच्या पुण्यात्म्यास चिरशांती देवो आणि दुःखित परिवारास हे दुःख सहन करण्याचे बळ प्रदान करो, हीच प्रार्थना.

शब्दांकन...

- राजेंद्र लाड,आष्टी (९४२३१७०८८५)

# पोलिसांच्या हुकूमशाही विरुद्ध पत्रकारांचे रणशिंग

## जालना जिल्ह्यात कृती समिती पत्रकारांवरील हल्ल्यांचा हिशोब मागणार

भ्रष्ट अधिकारी, गुंडशाही आणि पोलिसी मुजोरी विरुद्ध निर्णायक लढ्याची घोषणा

जालना / शेख फारुक

पत्रकारांवर होणारे भ्याड हल्ले पोलिसांची वाढती अरेरावी आणि गुंडगिरीला मिळणारे अभय याविरोधात जालना जिल्ह्यातील पत्रकारांनी आता आरपारच्या लढ्याचे रणशिंग फुंकले आहे. लेखणी विकली जाणार नाही झुकणार नाही आणि अन्याय करणाऱ्यांना उघडे पाडल्याशिवाय थांबणार नाही असा निर्धार व्यक्त करत जिल्ह्यातील संपादक,वार्ताहर आणि प्रतिनिधींनी एकत्र येत पत्रकार कृती समिती स्थापन केली.पत्रकार संतोष भुतेकर आणि राहुल मुळे यांच्यावर झालेल्या जीवघेण्या हल्ल्याच्या निषेधार्थ आयोजित बैठकीत पत्रकारांचा संताप अक्षरशः उसळला होता.गुन्हेगार आणि काही भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या संगनमता विरोधात उपस्थितांनी जोरदार आवाज उठवत कठोर आंदोलनाची चेतावणी दिली.

पत्रकार संरक्षण कायदा फॅड आहे ? डीवायएसपी कुलकर्ण्यांच्या वक्तव्याने संतापाचा स्फोट कायदा काय तुमच्या बापासाठी आहे ?दोन दिवसांपूर्वी पत्रकारांच्या शिष्टमंडळाने उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांची भेट घेऊन आरोपींवर पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत कारवाईची मागणी केली होती.मात्र पत्रकार संरक्षण कायदा हे एक फॅड झाले आहे असे कथित वक्तव्य केल्याची माहिती ज्येष्ठ पत्रकार लियाकत खान यांनी बैठकीत मांडताच संतापाची लाट उसळली.पत्रकार संरक्षण कायदा काय तुमच्या बापासाठी आहे का ? पत्रकारांनी या वक्तव्याला कायद्याचा अवमान आणि पत्रकारितेचा अपमान ठरवत संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध कायदेशीर व लोकशाही मार्गाने लढा उभारण्याचा इशारा दिला. पदाचा माज



आणि अधिकारांची मुजोरी आता खपवून घेतली जाणार नाही असा निर्धार व्यक्त करण्यात आला.

चंदनझिरा पोलिसांचे वाभाडे गुटखा माफियांचे लाड तर पत्रकारालाच ७ तास डांबले ?

महिला पत्रकार आयेशा खान मुलानी यांनी चंदनझिरा पोलीस ठाण्याच्या भ्रष्ट कारभाराची लक्तरे वेशीवर टांगली.जीव धोक्यात घालून पत्रकाराने गुटख्याची गाडी पकडून दिल्यानंतर गुटखा माफियावर कारवाई करण्याऐवजी चंदन झिरा पोलिसांनी उलट माहिती देणाऱ्या पत्रकाराला ७ तास पोलीस ठाण्यात बसवून ठेवण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला.गुन्हेगारांवर कारवाई करण्याऐवजी माहिती देणाऱ्यालाच त्रास देणारी व्यवस्था कोणासाठी काम करते ? असा संतप्त सवाल उपस्थित करत त्यांनी भ्रष्ट अधिकाऱ्यांची खाकी उतरवण्यासाठी ही समिती रस्त्यावर उतरेल असा इशारा आयेशा खान यांनी दिला.

ग्रुप पत्रकारिताचा नवा फॉर्म्युला भ्रष्टाचाराच्या फाईली आता थेट जनतेसमोर

पत्रकार विनोद काळे यांनी आता केवळ निषेध व निवेदनांपुरते न थांबता ग्रुप पत्रकारिता च्या माध्यमातून भ्रष्टाचार,गैरव्यवहार आणि प्रशासनातील काळे धंदे उघड करण्याचे आवाहन केले.

पत्रकार कैलास फुलारी यांनी जिल्हाभरातील पत्रकारांना एका प्रभावी व्यासपीठाखाली आणण्यासाठी कृती समितीचा प्रस्ताव मांडला त्याला उपस्थितांनी उत्स्फूर्त पाठिंबा दिला.

अच्युत मोरे यांनी पत्रकारितेच्या नावाखाली पोलिसांच्या दारात रेंगाळणाऱ्या आणि संघटनेत फूट पाडणाऱ्या घटकांनाही थेट इशारा देत जर पत्रकारांच्या लढ्यात गद्दारी करणाऱ्यांचीही नावे जनतेसमोर आणली जातील असे स्पष्ट केले.

ज्येष्ठ पत्रकार अंकुशराव देशमुख यांचा खंबीर पाठिंबा

गेल्या सात दशकांपासून पत्रकारितेत कार्यरत असलेले ज्येष्ठ पत्रकार अंकुशराव देशमुख (आप्पा) यांनी पत्रकारांवरील हल्ल्याचा तीव्र निषेध नोंदविला. ते म्हणाले सत्ता,संपत्ती आणि पदे कायमस्वरूपी नसतात. मात्र पत्रकारिता ही लोकशाहीचा आत्मा आहे. भुतेकर आणि मुळे यांच्यावरील हल्ला हा एका व्यक्तीवर नव्हे तर संपूर्ण पत्रकारितेवर झालेला हल्ला आहे. या लढ्यात मी शेवटपर्यंत पत्रकारांसोबत उभा राहीन.

बैठकीनंतर जिल्ह्यातील पत्रकार अधिक आक्रमक भूमिकेत आले असून पत्रकारांवरील अन्याय, पोलिसी मुजोरी आणि गुन्हेगारी प्रवृत्तींविरोधात व्यापक जनआंदोलन उभारण्याचे संकेत देण्यात आले आहेत.

अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी पत्रकार कृती समितीची स्थापना

लढवय्ये पत्रकार सरसावले पत्रकारांवरील हल्ले पोलिसी अरेरावी आणि गुंडशाहीविरोधात एकसंघ लढा उभारण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या पत्रकार कृती समिती मध्ये पुढील पत्रकारांनी आपली नावे नोंदवून सक्रिय सहभागाची तयारी दर्शविली आहे

कैलास फुलारी,रविकांत दानम, दीपक शेळके,राजेश भालेराव, लियाकत खान,शेख फारूक, भरत मानकर,आयेशा खान मुलानी,संतोष भुतेकर,विद्या जाधव,महेजबीन शेख,अभय यादव,अच्युत मोरे,शेख नजीर गणी,नरेंद्र जोगड,गणेश जाधव, ओ.के.शिंदे,सुहास वैद्य, ज्ञानेश्वर साळुंके,बालाजीअडियाल आणि दीपक नाटभजन.

# मानवी जीवनात सत्पात्री दानाचे अनन्यसाधारण महत्त्व-ह.भ.प. श्रीनाथ महाराज गोसावी

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) अधिक मासाचे औचित्य साधून आष्टी येथील संस्कार केंद्रात हरिभक्त परायण ह.भ.प. श्रीनाथ महाराज गोसावी यांची सुश्राव्य कीर्तन सेवा नुकतीच संपन्न झाली. यावेळी संत तुकाराम महाराजांच्या सदा नाम घोष करू हरी कथा या अभंगावर चिंतन करताना त्यांनी मानवी जीवनातील सत्पात्री दानाचे महत्त्व विशद केले. तसेच अखिल भारतीय वारकरी मंडळाचे तालुकाध्यक्ष ह.भ.प. दिनकर महाराज तांदळे यांच्या अभिष्टचिंतनानिमित्त त्यांचा शाल, श्रीफळ, हार व फेटा बांधून यथोचित सन्मान करण्यात आला.

कीर्तन सेवेदरम्यान ह.भ.प. श्रीनाथ महाराज गोसावी यांनी तीर्थक्षेत्रांचे महत्त्व, सद्विचार, सदाचार आणि भगवंताच्या नामस्मरणाची महती प्रभावीपणे सांगितली. प्रत्येकाने आपल्या जीवनात दान करावे, मात्र ते दान सतत सत्पात्री असावे, असा मोलाचा संदेश त्यांनी दिला. संत साहित्याच्या आधारे केलेले त्यांचे अभंग चिंतन आणि जीवनमूल्यांवरील प्रबोधनात्मक विचार उपस्थित श्रोत्यांच्या मनाला स्पर्शून गेले. त्यांच्या रसाळ वाणीतील कीर्तनामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता.कीर्तनानंतर झालेल्या अभिष्टचिंतन सोहळ्यात ह.भ.प. दिनकर महाराज तांदळे यांच्या पारमार्थिक, सामाजिक व साहित्यिक कार्याचा गौरव करण्यात आला. संत माऊली महाराज चाकरवाडीकर यांचा कृपाशीर्वाद लाभलेल्या तांदळे महाराजांनी संतचरित्रांवर अनेक ग्रंथांचे



लेखन करून वारकरी संप्रदायाच्या वैचारिक परंपरेला मोठे योगदान दिले आहे. त्यांच्या कार्याचा गौरवपूर्ण परिचय ह.भ.प. सोनाजी महाराज बनकर यांनी आपल्या अभ्यासपूर्ण सूत्रसंचालनातून करून दिला.संस्कार केंद्रात दररोज सायंकाळी हरिपाठ तसेच विविध ग्रंथांवरील चिंतनाचे नियमित सत्र आयोजित केले जाते. संत तुकाराम गाथेवर ह.भ.प. रामदास डोरले (नाना), ज्ञानेश्वरीवर ह.भ.प. श्रीहरी महाराज पुरी, दासबोधावर ह.भ.प. सोनाजी महाराज बनकर तर श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांच्या चरित्रावर ह.भ.प. मंगेश काका जोशी महाराज मार्गदर्शन करतात. संतविचारांच्या माध्यमातून समाजात संस्कार, सदाचार आणि अध्यात्मिक जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने हे उपक्रम राबविले जात आहेत.

या कार्यक्रमासाठी एसबीआय स्टेशन रोड शाखेचे व्यवस्थापक दीपक निकुंभे, ह.भ.प. किसन रासकर, पांडुरंग महाराज गर्जे, गोरे महाराज, आप्पा महाराज सुळे, नानासाहेब महाराज तवले, शहाजी महाराज वाल्हेकर, सूर्यकांत कुलकर्णी, महेंद्र जोशी, माजी सरपंच ह.भ.प. राधिकाताई लोखंडे, घोडके ताई, गर्जे ताई, मोहिनीताई जोशी, प्रगतीताई जोशी यांच्यासह अनेक भाविक उपस्थित होते. तसेच अधिक मासानिमित्त झालेल्या सेवापूजन, संतपूजन व अभिष्टचिंतन सोहळ्यासाठी ह.भ.प. उत्तमराव धोंडे महाराज, झगडे महाराज, नानासाहेब भोगाडे महाराज, घनश्याम खलाशे महाराज, संतोष बोरुडे सर, किसन जगताप महाराज, कारंडे महाराज, मोहन चटाले दाजी यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थिती दर्शविली. पुणे येथून आलेले हरिभक्त परायण अरुण करवंदे, सौ. अलकाताई करवंदे व सच्चिदानंद कुलकर्णी यांचीही विशेष उपस्थिती लाभली.कीर्तन सेवा, संतपूजन आणि सत्कार सोहळ्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. उपस्थित भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेत भक्ती, अध्यात्म आणि संतविचारांनी समृद्ध झालेल्या या सोहळ्याचा आनंद लुटला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हरिभक्त परायण जोशी परिवार व संस्कार केंद्रातील सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# क्रांतीनगर परिसरात जॉलीबाबा मल्टी सर्विसेसचा उद्घाटन सोहळा उत्साहात संपन्न

केज/प्रतिनिधी

क्रांतीनगर,कानडी रोड, केज येथे नागरिकांना विविध ऑनलाईन, डिजिटल,बँकिंग व शासकीय सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देणाऱ्या 'जॉलीबाबा मल्टीसर्विसेस' या सेवा केंद्राचा उद्घाटन सोहळा दि.६ जुन शनिवार रोजी सकाळी सुमारे दहा वाजता उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.परिसरातील नागरिक,मान्यवर व सामाजिक क्षेत्रातील विविध व्यक्तींच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला.या सेवा केंद्राचे उद्घाटन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबुराव गालफाडे तसेच राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) केज तालुका अध्यक्षा सौ.शितलताई लांडगे यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले. उद्घाटनानंतर उपस्थित मान्यवरांनी सेवा केंद्राची पाहणी करून नव्या उपक्रमास शुभेच्छा दिल्या.यावेळी ज्येष्ठ पत्रकार चंद्रकांत पाटील, आझाद क्रांती सेनेचे तालुका उपप्रमुख अनिल जी लोखंडे,अंगणवाडी कार्यकर्ती नेहरकर मडम यांच्यासह क्रांती नगर परिसरातील अनेक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.उपस्थित मान्यवरांनी ग्रामीण व सर्वसामान्य नागरिकांना विविध शासकीय आणि ऑनलाईन सेवांसाठी होणारी धावपळ कमी करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे सांगितले.जॉलीबाबा मल्टीसर्विसेस या केंद्रा मार्फत आधार कार्ड सेवा,बँक खाते उघडणे, ई-केवायसी,मोबाईल रिचार्ज,ऑनलाईन पेमेंट, शासकीय योजनांचे अर्ज,लाडकी बहीण




योजना,पीएम किसान, निराधार योजना,राशन कार्डसंबंधित सेवा तसेच इतर विविध ऑनलाईन सुविधा नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.दुकानाचे प्रोप्रायटर पत्रकार पांडुरंग कसबे यांनी उपस्थित सर्व मान्यवर व नागरिकांचे आभार मानले.नागरिकांना विश्वासार्ह,जलद व दर्जेदार सेवा देण्याचा मानस व्यक्त करत त्यांनी या केंद्राच्या माध्यमातून सर्वसामान्यांनाआवश्यक सेवा सुलभपणे उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न राहील,असे सांगितले.

क्रांती नगर परिसरात नव्याने सुरू झालेल्या जॉलीबाबा मल्टी सर्विसेसच्या उद्घाटन सोहळ्याला नागरिकांचा उत्स्फूर्तप्रतिसाद लाभला असून हा सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरित्या संपन्न झाला.

# साबला येथे शिवराज्याभिषेक दिन मोठ्या उत्साहात साजरा



केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालय साबला यांच्या वतीने प्रथम नागरिक सरपंच जनाबाई नरहरी काकडे यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ मां साहेब, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत घेऊन शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी समाजसेवक नरहरी शहाजी काकडे,युवासेना (शिंदे गट) तालुकाप्रमुख दत्तकुमार काकडे, जालिंदर मुळे,गणेश कटारे,विशाल काकडे, गुलाब मुळे,माऊली नाईकनवरे,श्रीमंत नाईकनवरे,राजेभाऊ काकडे,महादेव काकडे, सुरेश शिंदे,बाबासाहेब शिंदे,बाळासाहेबकाकडे, धनंजय नाईकनवरे, विष्णू काकडे,रुस्तुम मस्के,अशोक पांचाळ, दशरथ कटारे,आत्माराम काकडे,अंगद काकडे, धनंजय नाईकनवरे, साहेबराव काकडे,गोरख कटारे,सुरेश नाईकनवरे, विठ्ठल काकडे,अशोक काकडे,सतिश नाईकनवरे,विजय नाईकनवरे,आप्पा काकडे,आश्रुबा नाईकनवरे फोटो ग्राफर राहुल मुळे,नितिन काकडे इत्यादी शिवप्रेमी,शिवभक्त यांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज यांचा शिवराज्याभिषेक दिन कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला.

# पत्रकारावर भ्याड हल्ला भोकरदन मराठी पत्रकार संघाचा तीव्र निषेध


## दैनिक 'जग मित्र' संपादक संतोष भुतेकर यांच्यावर हल्ला चौथ्या स्तंभावर आघात आरोपींवर पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत कारवाईची मागणी

भोकरदन इसरारखान पठाण

सत्य मांडणाऱ्या लेखणीवर हल्ला म्हणजे लोकशाहीवरच हल्ला. ५ जून रोजी दैनिक 'जग मित्र'चे संपादक व ज्येष्ठ पत्रकार संतोष भुतेकर यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ भोकरदन मराठी पत्रकार संघाने उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी यांना निवेदन दिले. आरोपींवर तात्काळ कठोर कारवाई करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

निवेदनात संघाने स्पष्ट म्हटले आहे की, पत्रकारांवर होणारे हल्ले हे केवळ व्यक्तीवरचे हल्ले नसतात. ते लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावर होणारे आघात असतात. पत्रकार समाजातील अन्याय, भ्रष्टाचार आणि जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम करतात. अशा परिस्थितीत सत्य लिहिणाऱ्या पत्रकारांवर हल्ले होणे ही निषेधार्ह आणि चिंताजनक बाब आहे.

पत्रकारांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर संतोष भुतेकर यांच्यावर झालेल्या



हल्ल्यामुळे जिल्ह्यातील पत्रकारांमध्ये भीतीचे वातावरण आहे. त्यामुळे हल्ल्यामागील सर्व आरोपींचा तात्काळ शोध घेऊन त्यांच्यावर पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी ठाम मागणी संघाने केली.

तसेच या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींना कठोर शिक्षा द्यावी. भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी पत्रकारांच्या सुरक्षेसाठी प्रभावी उपाययोजना राबविण्याची गरज संघाने अधोरेखित केली.निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री, गृहमंत्री, जिल्हाधिकारी जालना आणि उपविभागीय पोलीस अधिकारी भोकरदन यांना पाठविण्यात आल्या आहेत. यावेळी पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, प्रशासनाने या गंभीर प्रकरणाची दखल घेऊन तातडीने कारवाई करावी. पत्रकारांची सुरक्षा म्हणजे लोकशाहीचे रक्षण आहे यावर कठोर भूमिका घेणे आता काळाची गरज आहे.

निवेदन देताना जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष फकिरा देशमुख, ज्येष्ठ पत्रकार विजय सोनवणे, गणेश औटी, सुनिल जाधव, सुरेश बनकर, तुषार पाटील, महेश देशपांडे, सांडू पाटील नामदे, शेख इरफान, शेख सलीम, इम्रान खान, सुरेश शेळके, रमेश इंगळे, सुरेश गिराम, युवराज पगारे, वैभव सोनवणे, कमलकिशोर जोगदंडे, विलास खांडवे, संजय पैठणकर, प्रताप साळवे, अमित लोहाडे यांच्यासह मोठ्या संख्येने पत्रकार उपस्थित होते.

# शासकीय नोकरीचे आमिष दाखवून अंबाजोगाईच्या तरुणाची चार लाखांची फसवणूक

## जिल्हाधिकाऱ्यांचे नाव पुढे करून उकळली रक्कम, गुन्हा दाखल होताच तोतया महिला अधिकारी फरार

अंबाजोगाई:प्रतिनिधी:--

अंबाजोगाई येथे जिल्हाधिकारी कार्यालयात वैयक्तिक सहाय्यक (पीए) पदावर नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून एका २४ वर्षीय सुशिक्षित बेरोजगार तरुणाची चार लाख रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी शहर पोलीस ठाण्यात काजल देविदास भट्ट नामक महिलेविरुद्धफसवंचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी महिलेने स्वतःला महसूल विभागातील अधिकारी असल्याचे भासवून हा संपूर्ण डाव रचला होता. बनावट नियुक्ती आदेश हाता पडल्यानंतर फसवणूक झाल्याचे लक्षात येताच तरुणाने पोलिसांत धाव घेतली आहे. विशेष म्हणेज अंबाजोगाईच्या अपर जिल्हाधिकारी आणि बीडचे जिल्हाधिकारी यांना पैसे द्यावयाचे आहेत असे सांगून त्या महिलेने तरुणाकडून रक्कम उकळली.

या घटनेतील फिर्यादी ओमकार संतोष शिंदे (वय २४, रा. अमृतेश्वरनगर, अंबाजोगाई) हा तरुण सुशिक्षित असून स्पर्धा परीक्षेची तयारी करत आहे. संशयित महिला आरोपी काजल देविदास भट्ट (रा. मारवाडगल्ली, नानज, ता. जामखेड) ही फिर्यादीच्या मामीच्या घरी भाड्याने राहत होती. तिने स्वतःला अंबाजोगाई येथील अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयात सहाय्यक महसूल अधिकारी म्हणून कार्यरत असल्याचे सांगितले होते. काही दिवसांपूर्वी काजलने फिर्यादीच्या मामीला गाठून बीड जिल्हाधिकारी कार्यालयात वैयक्तिक सहाय्यक पदाच्या तीन जागा रिक्त असल्याचे सांगितले. आपले वरिष्ठ अधिकाऱ्यांशी आणि जिल्हाधिकाऱ्यांशी चांगले संबंध असल्याचे सांगून तिने ओमकारला नोकरी लावण्याचे आमिष दाखवले. या पदासाठी ४५ हजार रुपये पगार आणि प्रवास भत्ता मिळेल असे सांगून तिने कुटुंबाला जाळ्यात ओढले. यासाठी तिने ५ लाख रुपयांची मागणी केली, जी तडजोडीअंती ३ लाख रुपयांवर निश्चित झाली.

# भोकरदन येथे शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा

## स्मारक स्वच्छतेने सुरुवात, छत्रपती शिवाजी महाराज की जय च्या जयघोषात सोहळा संपन्न

भोकरदन इसरारखान पठाण

स्वराज्याची प्रेरणा, स्वच्छतेचा संकल्प या भावने भोकरदन शहरात शिवराज्याभिषेक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला .

सोहळ्याची सुरुवातच वेगळ्या अंदाजात झाली. सर्व शिवप्रेमींनी प्रथम छत्रपतींच्या स्मारकाची स्वच्छता केली. महाराजांनी स्वराज्य घडवले, आपण स्मारक स्वच्छ ठेवू हा संदेश देत हात झाडू घेऊन तरुण-वृद्धांनी एकत्रितपणे स्मारक परिसर स्वच्छ केला.

स्वच्छतेनंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पुजन आणि पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यानंतर संपूर्ण परिसर छत्रपती शिवाजी महाराज की जय, हर हर महादेव च्या जयघोषाने दुमदुमला. भगवे झेंडे, गुलाल उधळण आणि शिवभक्तांच्या घोषणांनी भोकरदनचे वातावरण शिवमय झाले.

या कार्यक्रमात विविध पक्ष-संघटनांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक, शेतकरी आणि तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी जाती-पातीचा भेद विसरून छत्रपतींच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प केला.

सार्वजनिक शिवजयंती



उत्सव समितीचे अध्यक्ष विजय जंजाळ आणि सचिव रामेश्वर सोनवणे यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. त्यांनी सांगितले की, शिवराज्याभिषेक म्हणजे फक्त उत्सव नाही, तर स्वच्छता, शिस्त आणि स्वाभिमानाचा संदेश आहे.

सुरेश पाटील तळेकर, नगराध्यक्ष शमीम मिर्झा, काँग्रेस ता. अध्यक्ष त्रिंबक पाबळे, नगरसेवक शफिक पठाण, कदिर बापु, मुकेश चिने, नसीम पठाण, राजेंद्र देशमुख, मा. सैनिक बबन शिंदे, रामचंद्र गायके, वामन जंजाळ, सोपान सपकाळ सर, ता. प्रसिद्धीप्रमुख अप्पासाहेब जाधव, सचिन गिरणारे, शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष काकासाहेब साबळे, काँग्रेस युवक जिल्हाध्यक्ष राहुल देशमुख, मदत फाऊंडेशनचे अध्यक्ष दिनेश पडोळ, कृष्णा जंजाळ सर, भगवान देठे सर, विजय साबळे सर, पत्रकार रमेश इंगळे, युवराज पगारे, पांडूरंग लोखंडे, राजु तळेकर, मिसाळ सर, जगदिश गायकवाड, समाधान तळेकर यांच्यासह मोठ्या संख्येने शिवप्रेमी उपस्थित होते.

# तुकाराम मुंडे यांचा राष्ट्रपती सन्मान व्हावा – सुबोध सावजी

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यामध्ये कार्यरत असलेले तुकाराम मुंढे आयुक्त अन्न व औषध प्रशासन अधिकारी यांना आा पण राष्ट्रपती सन्मान द्यावा अशी मागणी माजी मंत्री सुबोध सावजी यांनी केली आहे .राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांना पाठवलेल्या पत्रात ते म्हणतात की, तुकाराम मुंढे यांचा आपण मानसन्मान करावा कारण तुकाराम मुंढे यांच्या अंदाजे २१ वर्षाच्या सेवेत २४ बदल्या झाल्यात.बदल्या होण्यामागे हलगर्जीपणा, कामात अनियमियत्ता, भ्रष्टाचार, वरिष्ठांचा अवमान करणे, यापैकी कोणतेही कारण नाही याची आपण पूर्णपणे चौकशी करून घ्यावी.यांचे सेवेमध्ये यांनी जेथे ही काम केले तेथे अतिशय इमानदारीने, भ्रष्टाचार न होऊ देणे अशीच सेवा दिली.श्री



तुकाराम मुंढे ज्या विभागामध्ये आता काम करीत आहेत त्याच विभागात चार सहा महिन्यापूर्वी कार्यालयात अधिकारी लाच घेताना पकडले याच कार्यालयाचे मंत्री यांचे अश्लील व्हिडिओ महाराष्ट्राने पाहिले. तुकाराम मुंढे यांनी या विभागाचा कार्यभाग सांभाळल्यापासून महाराष्ट्रात भ्रष्टाचार निर्मूलन होऊ शकते ही खात्री जनतेमध्ये आली.आमची मागणी आहे यानंतर जर श्री तुकाराम मुंढे यांची बदली झाली तर यांना महाराष्ट्राच्या गृह विभागात मोठ्या पदावर यांची नियुक्ती करावी.आमच्या मागणीचा आपण अवश्य विचार करावा व कर्तबगार अधिकाऱ्याचा मानसन्मान होऊ शकतो हे उदाहरण देशामध्ये चांगले होईल.श्री तुकाराम मुंढे यांच्याशी माझा कोणताही संबंध नाही नातेसंबंध नाही जातीचा संबंध नाही. त्यांनी मला कधी पाहिले नाही मी त्यांना कधी पाहिले नाही.. परंतु मी गेल्या ५० वर्षात तीन वेळा आमदार एक वेळा मंत्री होतो असा अधिकारी हा या पन्नास वर्षात पहिल्यांदाच पाहायला मिळाला याकरता ही शिफारस आहे असे या पत्रात म्हटले आहे.

# शेतकऱ्यांनी कर्जमाफी योजनेचा लाभ घ्यावा – नवनाथ अण्णा शिराळे पाटील

बीड ।प्रतिनिधी

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सूनेत्राताई पवार तसेच मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या प्रयत्नांमुळे आणि शेतकरी हिताच्या भूमिकेमुळे राज्यातील पात्र शेतकऱ्यांसाठी दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीचा महत्त्वपूर्ण निर्णय राबविण्यात आला आहे. या योजनेचा लाभ सर्व पात्र शेतकरी बांधवांनी घ्यावा, असे आवाहन शेतकरी पुत्र तथा भाजपाचे ज्येष्ठ नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी केले आहे.प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी म्हटले आहे की, ज्या शेतकरी बांधवांकडे दोन लाख रुपयांपेक्षा अधिक कर्ज शिल्लक आहे त्यांनी नियमानुसार उर्वरित रक्कम भरून आपले कर्ज खाते नियमित करावे व कर्जमाफीचा लाभ घ्यावा. तसेच सर्व पात्र शेतकऱ्यांनी आपल्या बँक खात्यांचे केवायसी (घधउ) अद्ययावत करून घ्यावे, जेणेकरून योजनेचा लाभ मिळविताना कोणतीही अडचण निर्माण होणार नाही.शेतकरी हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून त्याच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र व राज्य शासन सातत्याने कार्यरत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी, शेती उत्पादन खर्च कमी करण्यासाठी आणि कृषी क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, पीक विमा योजना, मृदा आरोग्य पत्रिका, सिंचन प्रकल्प, कृषी पायाभूत सुविधा विकास तसेच शेतमालाला बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत.महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री



एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री सूनेत्राताई पवार आणि मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांना आर्थिक बळकटी देण्यासाठी विविध कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबविल्या जात आहेत. शेतीसाठी पायाभूत सुविधा, जलसंधारण, सिंचन क्षमता वाढ, पीक नुकसान भरपाई, कृषी यांत्रिकीकरण आणि शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत यांसारख्या अनेक उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबांना मोठा आधार मिळत आहे.

कर्जमाफीचा निर्णय हा शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देणारा महत्त्वपूर्ण निर्णय असून त्यातून हजारो शेतकरी कुटुंबांना नव्याने उभारी मिळणार आहे. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असून त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी कटिबद्ध आहे, असेही नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी नमूद केले आहे.

तरी सर्व पात्र शेतकरी बांधवांनी संबंधित बँकांशी संपर्क साधून आवश्यक प्रक्रिया पूर्ण करावी, आपले केवायसी अद्ययावत करून घ्यावे आणि शासनाच्या या महत्त्वपूर्ण कर्जमाफी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी केले आहे.

# संकटमोचक,दिलदार आणि माणुसकी जपणारे व्यक्तिमत्त्व

## श्री.प्रविण कदम यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

आष्टी – (एस.राजेंद्र लाड) संकटाच्या काळात धावून जाणारा, प्रत्येक प्रश्नावर अचूक उत्तर शोधणारा आणि कोणत्याही परिस्थितीत शांतपणे मार्ग काढणारा व्यक्ती म्हणजे जुने जाणते लोक ज्याला चौकनी चिरा म्हणत असत. अशाच कर्तृत्ववान, संयमी आणि समाजाभिमुख व्यक्तिमत्त्वाचे धनी असलेले नाभिक संघटनेचे तालुकाध्यक्ष तथा लोकनेते, मराठवाडा भूषण आमदार सुरेश धस (आण्णा) यांचे एकनिष्ठ कार्यकर्ते श्री. प्रविण कदम यांचा वाढदिवस विविध स्तरातून शुभेच्छांच्या वर्षावात उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

श्री. प्रविण कदम यांनी आपल्या सामाजिक, संघटनात्मक आणि राजकीय कार्यातून तालुक्यात एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. कोणत्याही व्यक्तीच्या अडचणीच्या प्रसंगी मदतीचा हात पुढे करणारे, सर्वसामान्यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणारे आणि कार्यकर्त्यांच्या सुख-दुःखात सदैव सहभागी होणारे नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.

नाभिक समाजाच्या संघटनात्मक बांधणीसाठी त्यांनी केलेले कार्य विशेष उल्लेखनीय मानले जाते. समाजातील विविध प्रश्न सोडविणे, युवकांना दिशा देणे, सामाजिक ऐक्य निर्माण करणे आणि संघटनेला अधिक सक्षम करण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. त्यामुळे समाजात त्यांच्याविषयी विशेष आदर आणि विश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे. राजकीय क्षेत्रातही श्री. प्रविण कदम यांनी लोकनेते आमदार सुरेश धस यांच्या विचारांशी एकनिष्ठ राहून पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. प्रत्येक



कार्यकर्त्याला आपलेसे मानणे, त्यांच्या अडचणी समजून घेणे आणि त्यावर मार्ग काढण्यासाठी तत्पर राहणे ही त्यांची कार्यशैली अनेकांना प्रेरणादायी वाटते.मित्रपरिवार, समाजबांधव आणि सहकाऱ्यांमध्ये श्री. प्रविण कदम हे दिलदार, मनमिळावू आणि माणुसकी जपणारे व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. नाती जपणे, माणसे जोडणे आणि संकटात असणाऱ्यांना आधार देणे हीच त्यांच्या जीवनाची खरी ताकद असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली. त्यांच्या वाढदिवसानिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवर, समाजबांधव, मित्रपरिवार आणि कार्यकर्त्यांनी त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला. आपल्या कार्याला उत्तरोत्तर यश लाभो, समाजातील मान-सन्मान अधिक वृद्धिंगत होवो, उत्तम आरोग्य, सुख, समृद्धी आणि दीर्घायुष्य लाभो, अशा शब्दांत त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. समाजकार्य, संघटन कौशल्य, माणुसकीची जपणूक आणि नेतृत्वावरील निष्ठा यामुळे श्री. प्रविण कदम यांनी समाजात निर्माण केलेले स्थान निश्चितच उल्लेखनीय असून, भविष्यातही त्यांच्या कार्याचा लाभ समाजाला मिळत राहील, असा विश्वास यावेळी अनेकांनी व्यक्त केला.



# भाजपा नेते रमाकांत मुंडे यांनी केली मयत सोमीनाथ मुंडेच्या कुटुंबाला केली आर्थीक मदत

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील देवगांव येथील ऊसतोड मजूर सोमीनाथ लक्ष्मण मुंडे यांचे एप्रिलमहिन्यात अल्पशा आजाराने निधन झाल्याने त्यांच्या कुटुंबाची शनिवार दि.६ जून रोजी भाजपाचे जेष्ठ नेते रमाकांत बापू मुंडे यांनी भेट घेऊन त्यांच्या कुटुंबाला आर्थिक मदत केली.यावेळी गावातील तरुण युवक व नागरीक उपस्थित होते.केज तालुक्यातील देवगांव येथील ऊसतोड मजूर सोमीनाथ लक्ष्मण मुंडे यांचे एप्रिल महीन्यात अल्पशा आजाराने निधन झाल्याने त्यांच्या पश्चात असलेल्या त्यांच्या घरातील पत्नी,लहान तीन मुले यांची दि.६ जून शनिवार रोजी भाजपाचे जेष्ठ नेते रमाकांत बापू मुंडे यांनी भेट घेऊन त्यांच्या कुंटूबांला धिर देऊन मयत सोमिनाथ मुंडे यांच्या पत्नी व मुले यांच्याकडे आर्थिक मदत करुन त्यांच्या दु:खात सहभागी असल्याने रमकांत बापू मुंडे यांनी सांगीतले.यावेळी देवगांवचे माजी सरपंच रामराव मुंडे,ग्रा.प.सदस्य छंदर मुरकुटे,पांडूरंगमुंडे, हनुमंत नागरगोजे, बापूसाहेब मुंडे,रामेश्वर नागरगोजे,पांडूरंग नागरगोजे,गोरख मुंडे हे यावेळी उपस्थित होते.

# शिल्पकार भास्कर सिल्लोडे पानवडोदकर यांच्या कलाकृतींचा राज्यभर गौरव; शेकडो मूर्तींमधून जपली कला आणि संस्कृती

छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी


आपल्या कुशल हातांनी माती, प्लास्टर, फायबर आणि विविध धातूंना कलात्मक रूप देत शेकडो आकर्षक मूर्ती साकार करणारे अवलिया शिल्पकार भास्कर सिल्लोडे पानवडोदकर यांनी शिल्पकलेच्या माध्यमातून एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या हातून साकारलेल्या विविध महापुरुष, संत, समाजसुधारक, देवी-देवतांच्या तसेच ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांच्या मूर्तींना राज्यभरातून मोठी मागणी होत आहे.

लहानपणापासूनच कलेची आवड असलेल्या भास्कर सिल्लोडे यांनी कोणत्याही मोठ्या शैक्षणिक संस्थेचा आधार न घेता स्वतःच्या जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर शिल्पकलेत प्रभुत्व मिळविले. सुरुवातीच्या काळात अत्यंत मर्यादित साधनसामग्रीतून काम सुरू केलेल्या सिल्लोडे यांनी आपल्या कलागुणांच्या बळावर आज अनेकांच्या मनात स्थान निर्माण केले आहे.

त्यांनी आतापर्यंत श्री गणेश, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, अहिल्यादेवी होळकर, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम महाराज, संत गाडगेबाबा यांच्यासह अनेक ऐतिहासिक व धार्मिक व्यक्तिमत्त्वांच्या मूर्ती घडवल्या आहेत. त्यांच्या मूर्तींमध्ये वास्तवदर्शी भाव, आकर्षक रंगसंगती आणि सूक्ष्म कलाकुसर पाहायला मिळते.

विशेष म्हणजे, मूर्ती तयार करताना ते संबंधित व्यक्तिमत्त्वाचा इतिहास, वेशभूषा, देहबोली आणि चेहऱ्यावरील भाव यांचा सखोल अभ्यास करतात. त्यामुळे त्यांच्या कलाकृती केवळ मूर्ती न राहता त्या इतिहास आणि संस्कृतीचे जिवंत दर्शन घडवतात. अनेक शाळा, महाविद्यालये, सार्वजनिक मंडळे, सामाजिक संस्था आणि धार्मिक ट्रस्ट यांनी त्यांच्या मूर्तींची प्रतिष्ठापना केली आहे.

गणेशोत्सव, शिवजयंती, आंबेडकर जयंती, संत महोत्सव आणि विविध धार्मिक उत्सवांमध्ये त्यांच्या कलाकृतींना विशेष मागणी असते. अनेक सामाजिक आणि सांस्कृतिक संघटनांनी त्यांच्या कार्याचा



गौरव करत त्यांच्या कलाकृतींमुळे सिल्लोड तालुक्यासह पानवडोद गावाचे नाव राज्याच्या कानाकोपऱ्यात पोहोचले आहे.

शिल्पकलेच्या माध्यमातून भारतीय संस्कृती, इतिहास आणि परंपरा जतन करण्याचे कार्य ते सातत्याने करत आहेत. नव्या पिढीने मोबाईल आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात पारंपरिक कला जपण्यासाठी पुढे यावे, असे आवाहनही ते वेळोवेळी करतात. अनेक युवकांना त्यांनी शिल्पकलेचे प्रशिक्षण देऊन स्वावलंबी बनविण्याचा प्रयत्न केला आहे.

आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ व्यवसाय म्हणून नव्हे तर समाजप्रबोधनाचे माध्यम म्हणून शिल्पकलेकडे पाहणारे भास्कर सिल्लोडे पानवडोदकर हे मराठवाड्याच्या कला क्षेत्रातील एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व ठरत आहेत. त्यांच्या कलाकृतींमधून कला, संस्कृती आणि इतिहास यांचा सुंदर संगम अनुभवायला मिळत असून भविष्यातही त्यांच्या हातून अनेक दर्जेदार कलाकृती घडतील, असा विश्वास कला रसिक व्यक्त करत आहेत.

# सेनगाव तहसील कार्यालयात महसूल विभागाच्या कामकाजाचा जिल्हाधिकाऱ्याकडून सविस्तर आढावा

सेनगाव / प्रतिनिधी

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी आज सेनगाव तहसील कार्यालयास भेट देऊन तालुक्यातील ग्राम महसूल अधिकारी (तलाठी), मंडळ अधिकारी तसेच तहसील कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची आढावा बैठक घेतली. महसूल विभागाच्या विविध योजनांची अंमलबजावणी, प्रलंबित कामांची स्थिती आणि नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांचा यावेळी सविस्तर आढावा घेण्यात आला.

या बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, उपजिल्हाधिकारी (सामान्य) अनिल माचेवाड, उपजिल्हाधिकारी (रोहयो) राजेश सरवदे, तहसीलदार सखाराम मांडवगडे यांच्यासह संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या बैठकीदरम्यान जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी वनजमिनीच्या नोंदी, लँड बँक निर्मिती, ई-पीक पाहणी, आगामी जनगणना तयारी, रस्ते विकास कामे, सार्वजनिक वितरण व्यवस्था (पुरवठा विभाग), शासकीय इमारतींची बांधकामे तसेच विविध महसुली विषयांचा सखोल आढावा घेतला. प्रत्येक विभागाच्या कामकाजाची प्रगती, अडचणी आणि प्रलंबित बाबींची माहिती संबंधित अधिकाऱ्यांकडून जाणून घेतली.

यावेळी त्यांनी ई-पीक पाहणीचे काम अचूक व वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना देत शेतकऱ्यांच्या नोंदी अद्ययावत ठेवण्यावर भर दिला. वनजमिनीच्या नोंदींची शहानिशा करून संबंधित प्रकरणे नियमानुसार मार्गी लावावीत, तसेच लँड बँकसाठी आवश्यक माहिती संकलित करून



अद्ययावत ठेवावी, असे निर्देश दिले. जनगणना पूर्वतयारीबाबत आवश्यक नियोजन, मनुष्यबळ व्यवस्थापन व माहिती संकलनाची प्रक्रिया काटेकोरपणे राबविण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. तसेच रस्ते व इमारत बांधकामांच्या कामांचा नियमित पाठपुरावा करून गुणवत्तापूर्ण व वेळेत कामे पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना देण्यात आले.सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना नियमित व पारदर्शक पद्धतीने धान्य वितरण होईल याची दक्षता घेण्याचे निर्देशही त्यांनी दिले. नागरिकांच्या तक्रारींना तातडीने प्रतिसाद देऊन महसूल विभागाशी संबंधित प्रकरणांचा वेळेत निपटारा करावा, असे त्यांनी सांगितले.बैठकीच्या शेवटी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रलंबित कामे तात्काळ निकाली काढण्याचे निर्देश देत, शासनाच्या विविध योजना आणि उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करून नागरिकांना गुणवत्तापूर्ण सेवा उपलब्ध करून देण्याचे आवाहन केले. महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, पारदर्शक आणि गतिमान करण्यासाठी सर्वांनी समन्वयाने काम करावे, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

# स्वानंद सार्वजनिक वाचनालयात शिवराज्याभिषेक दिन सोहळा विविध सांस्कृतिक कार्यक्रम घेवून उत्साहात संपन्न

केज/ प्रतिनिधी

स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता.केज जि.बीड येथे दिनांक ६ जून २०२६ रोजी शिवराज्याभिषेक सोहळा ग्रंथप्रदर्शन, व्याख्यान,रंगभरण स्पर्धा,वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा इत्यादी सांस्कृतिक कार्यक्रम घेवून जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, महाराष्ट्रातील सुप्रसिध्द वक्ते व परखड व्याख्याते प्राचार्य डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.सकाळी ९ ते ५ पर्यंत ग्रंथप्रदर्शन घेण्यात आले.याच दरम्यान सकाळी ९ ते १० या वेळात वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली.या स्पर्धेत प्रथम – गौरी ज्ञानेश्वर गायकवाड,द्वितीय शिवानी भगत यांनी प्राविण्य मिळविले.

१० ते ११ या वेळात सेवानिवृत्त मुख्याध्यापक छगननाना गायकवाड यांचे व्याख्यान संपन्न झाले.त्यानंतर ११ ते १२ या वेळात रंगभरण स्पर्धा घेण्यात अली.या स्पर्धेत प्रथम -विक्रमगायकवाड, द्वितीय – शिवानी भगत यांनी प्राविण्य मिळविले.



त्यानंतर निबंध स्पर्धा घेण्यात आली.यात प्रथम – गौरी गायकवाड,द्वितीय – आनंद गायकवाड यांनी प्रविण्य मिळविले. परिक्षक म्हणून सेवा निवृत्त मुख्याध्यापक छगननाना गायकवाड यांनी काम पाहिले. विजयी स्पर्धकांना प्राचार्य डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड,परिक्षक छगननाना गायकवाड, ए.बी.गायकवाड, बाळासाहेब गायकवाड यांच्या हस्ते प्रमाणपत्र देवून सन्मानीत करण्यात आले.शेवटी अध्यक्षीय समारोप डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केला.

आपल्या अध्यक्षीय समारोपात शिव राज्याभिषेक सोहळा या विषयी सविस्तर विवेचन करून शिवरायांच्या जनकल्याण विषयक कार्याची महती सांगीतली.तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचे शेती विषयक धोरण, पर्यावरण विषयकधोरण, महिला विषयक धोरण, परराष्ट्रधोरण,गड किल्ले विषयक धोरण,संरक्षण विषयक धोरण,जल संवर्धन विषयक धोरण, दळणवळण विषयक धोरण,राज्य कारभार विषयक धोरण,शक संवत विषयक धोरण, रयतेच्या कल्याणाचे धोरण,आर्थिक धोरण, राजनैतिक धोरण,जमीन सुधारणा विषयक धोरण शेतसारा – शेतमोजणी विषयक धोरण,परराष्ट्र धोरण,आरमार विषयक धोरण,कायदे विषयक धोरण अशाप्रकारची अनेक धोरणे आखून रयतेच्या हिताचे निर्णय व धोरणे राजांनी आखली व पूर्णत्वास नेली.राजाभिषेकाच्या निमित्ताने अष्टप्रधान मंडळ नेमून लोकशाही ची संकल्पना प्रत्यक्षात साकारली.छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेचे कल्याण हेच उदिष्ट्य डोळ्यासमोर ठेऊन राज्यकारभार केला असे प्रतिपादन डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले.

# सीसीटीव्हीच्या मदतीने हरवलेले सव्वादोन लाखांचे सोन्याचे दागिने मालकिणीला परत

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबाजोगाई तालुक्यातील चनई येथील रहिवासी रेखा युवराज क्षीरसागर यांचे सुमारे २ लाख २५ हजार किमतीचे सोन्याचे दागिने पोलिसांच्या तत्परतेमुळे पुन्हा मिळाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, रेखा क्षीरसागर या दि. २ जून २०२६ रोजी सकाळी लोखंडी सावरगाव येथून शिवाजी चौकाकडे ऑटो रिक्षाने प्रवास करत होत्या. ऑटो मध्ये बसण्याच्या घाईत त्यांच्या हातातील दागिन्यांची पिशवी शिवाजी चौक येथील ऑटो पॉईंटजवळ खाली पडली. मात्र त्यांना याची जाणीव न झाल्याने त्या पुढे निघून गेल्या.

दुसऱ्या दिवशी त्यांनी अंबाजोगाई पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीनंतर पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली असता, एक व्यक्ती सदरची पिशवी उचलून घेऊन जात असल्याचे आढळून आले. पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत त्या व्यक्तीची ओळख खंडू अंबादास साळवे (वय ६५, रा. भीमनगर, मांडवा रोड, परळी वैजनाथ) अशी पटवली.

पोलिसांनी त्यांच्या घरी जाऊन चौकशी केली असता, त्यांनी प्रामाणिकपणे पिशवी आपल्या ताब्यात असल्याचे सांगून ती पोलिसांकडे सुपूर्द केली. पिशवीमध्ये ५६ मणी, दोन सोन्याचे पिळ्याचे पेंडल आणि दोन सोन्याचे झुंबर असे सुमारे दीड तोळे वजनाचे व अंदाजे २.२५ लाख किमतीचे सोन्याचे दागिने आढळून आले.

त्यानंतर माननीय पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांच्या हस्ते सदरचे दागिने रेखा क्षीरसागर यांना परत करण्यात आले. हरवलेले




मौल्यवान दागिने अल्पावधीत शोधून काढण्यासाठी पोलीस हवालदार पांडुरंग काळे व पोलीस अंमलदार हनुमंत चादर यांनी सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने तपासणी करून संबंधित व्यक्तीचा शोध घेत मोलाची कामगिरी बजावली.या प्रकरणात प्रामाणिकपणा दाखवत दागिन्यांची पिशवी सुरक्षित ठेवून ती पोलिसांच्या स्वाधीन करणाऱ्या खंडू अंबादास साळवे यांचेही सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड – ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# शिवा संघटनेच्या वतीने भक्तीस्थळ राजूर (अहमदपूर) लातूर येथे १० जून रोजी शिवा वीरशैव लिंगायत गोलमेज परिषदेचे आयोजन

लातूर ।प्रतिनिधी

भारतीय जनगणना २०२६-२७ मध्ये धर्म व जातीची नोंद कशी करावी, महात्मा बसवेश्वरांचा बाराव्या शतकातील मूळ अनुभवमंडप व परशूकट्टा मुक्त करून जगभरातील पर्यटकांना पाहण्यासाठी खुला करा आणि महात्मा बसवेश्वर यांची देशभर शासकीय जयंती साजरी करा या दोन मागण्यांसाठी रामलिला मैदान नवी दिल्ली येथे धडक मोर्चा काढण्याबाबत चर्चा करून निर्णय घेणे आवश्यक आहे. म्हणून वीरशैव परंपरेतील व विरक्त परंपरेतील सर्व मठाधिपती (शिवाचार्य), शिवकीर्तनकार, प्रवचनकार, गायक-वादक, शिवा संघटनेचे प्रमुख पदाधिकारी व समाजातील अभ्यासक, साहित्यिक यांची बैठक शिवा संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेली आहे. वीरशैव लिंगायत गोलमेज परिषद बुधवार, दि.१० जून २०२६ रोजी लातूर जिल्ह्यातील अहमदपूर येथे शिवा संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीयअध्यक्ष प्रा. मनोहरजी धोंडे यांच्या नेतृत्वाखाली संपन्न होणार आहे.

वीरशैव लिंगायत समाजाचे मूलभूत प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रा.मनोहरजी धोंडे यांच्या नेतृत्वाखाली शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटना गेली ३० वर्षे देशभरात व देशाच्या बाहेरील राज्यात काम करत आहे. शिवा संघटनेच्या माध्यमातून समाजातील १८ पगड जातींना बरोबर घेऊन काम करण्याची संकल्पना प्रा. मनोहरजी धोंडे यांच्या विचारातून साकार होत आहे. वीरशैव लिंगायत धर्मामधील राज्यातील तरुणांनी आदर्श घ्यावा, अशा पद्धतीची आजपर्यंत अनेक समाजहित जोपासणारी व समाजाच्या न्याय हक्काचे शेकडो प्रश्न शासन दरबारी सोडवून समाजाला न्याय मिळवून देण्यात आला आहे. येणाऱ्या काळात वीरशैव लिंगायत समाजाची महाराष्ट्र राज्यामध्ये एक वज्रमूठ बांधून समाजाला एका व्यासपीठावर एकत्रित आणण्याचे कार्य शिवा संघटना करत आहे. येणाऱ्या जनगणना २०२६-२०२७ मध्ये वीरशैव लिंगायत समाजाने धर्म व जातीची नोंद कशी करावी, याविषयी या गोलमेज परिषदेत चर्चा होऊन एकमुखाने निर्णय होणार आहे. तसेच शिवा संघटना संस्थापक अध्यक्ष प्रा.मनोहरजी धोंडे यांचे मार्गदर्शन होणार आहे.

विविध विषयांवर चर्चा करून निर्णय घेण्यासाठी बुधवार, दि.१० जून २०२६ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत भक्तीस्थळ राजूर (अहमदपूर) जि.लातूर या ठिकाणी वीरशैव लिंगायत गोलमेज परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. बसवकल्याण येथील महात्मा बसवेश्वरांचा १२ व्या शतकातील मूळ अनुभवमंडप आणि महात्मा बसवेश्वर ज्या परशू कट्टयावर बसून न्याय दान करायचे तो परशूकट्टा मुक्त करून जगभरातील पर्यटकांना पाहण्यासाठी खुला करा. प्रतिवर्षी अक्षय तृतीया या दिवशी क्रांतीसूर्य जगज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांची देशभर शासकीय जयंती साजरी करा. या मुद्यावर वीरशैव लिंगायत गोलमेज परिषदेत चर्चा करण्यात येणार आहे. या गोलमेज परिषदेस पंचाचार्य मठासह विरक्त मठावरील साधारण १०० मठाधिपती, २०० शिवकीर्तनकार, प्रवचनकार, गायक-वादक व शिवा संघटनेचे राष्ट्रीय व राज्य पातळीवरील शेकडो पदाधिकारी, वीरशैव लिंगायत समाज बांधव, समाजातील साहित्यिक, अभ्यासक असे पाचशे पदाधिकारी उपस्थित राहून चर्चा करून निर्णय घेणार आहेत.

तरी महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातून वीरशैव-



लिंगायत समाजातील मठाधिपती, शिवकीर्तनकार, प्रवचनकार, गायकवादक, वीरशैव लिंगायत साहित्यिक-अभ्यासक, शिवा संघटनेचे पदाधिकारी व समाज बांधवांनी सदरील गोलमेज परिषदेस उपस्थित राहावे, असे आवाहन शिवा अ.भा.वीरशैव युवक संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीयअध्यक्ष प्रा.मनोहरराव धोंडे आणि वीरशैव लिंगायत गोलमेज परिषदेचे संयोजक यांनी केले आहे.

# शासकीय आयटीआय पाटोदा येथे २२ जून पर्यंत प्रवेश प्रक्रिया सुरू

पाटोदा ।प्रतिनिधी


संत भगवान बाबा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (खढख), पाटोदा येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ करिता प्रवेश प्रक्रिया अधिकृतपणे सुरू झाली आहे. या प्रवेश प्रक्रियेत १ जून पासून विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने व्यवसायाचे विकल्प (जर्ळिेपी) देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या संदर्भात संस्थेचे प्राचार्य बेलेकर आणि प्रवेश समिती यांनी परिपत्रकाद्वारे माहिती दिली आहे. त्यांनी आवाहन केले आहे की, जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा. विद्यार्थ्यांनी अभियांत्रिकी व बिगर-अभियांत्रिकी व्यवसायाकरिता आपले ऑनलाईन प्रवेश अर्ज भरून तांत्रिक कौशल्य आत्मसात करावे,




शैक्षणिक वर्षे २०२६-२७ च्या प्रवेशासाठी जोडारी, संधाता, तारतंत्री,पत्रेकारागीर, ड्रेस मेकिंग हे व्यवसाय उपलब्ध आहेत.

रोजगाराच्या आणि स्वयंरोजगाराच्या उत्तम संधी उपलब्ध करून देणाऱ्या या अभ्यासक्रमांसाठी इच्छुकांनी वेळेत आपले ऑनलाईन अर्ज सादर करावेत, असे आवाहन संस्थेचे प्राचार्य विजय बेलेकर यांनी केले आहे.



# आई-मुलीची दुहेरी कामगिरी ग्लोबल एक्सलन्स अवॉर्ड २०२६ ने जालना जिल्ह्याचा गौरव

जालना /प्रतिनिधी :-

अमेरिकन युनिव्हर्सिटी फॉर ग्लोबल पीस, यूएसए आणि ग्लोरियस ग्लोबल सोशल फाउंडेशन भारत यांच्या संयुक्त विद्यमाने जालना येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य ग्लोबल एक्सलन्स अवॉर्ड २०२६ सन्मान सोहळ्यात समाजसेवा आरोग्यसेवा व मानवकल्याण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या ११५ मान्यवरांचा गौरव करण्यात आला. या सोहळ्यात जालना जिल्ह्याच्या आई-मुलीने मिळविलेल्या यशाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

या प्रतिष्ठित कार्यक्रमात अनिता जगदीश भालतीलक यांना शिक्षण व समाजकार्यातील उत्कृष्ट योगदानाबद्दल बेस्ट नेशन बिल्डर अवॉर्ड २०२६ तसेच एक्सलन्स कॉन्ट्रिब्युशन टू पीस एज्युकेटर अवॉर्ड २०२६ या दोन मानाच्या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. तर त्यांची कन्या कु. आराधना वानखेडे हिला आरोग्यसेवा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल फ्लॉरेन्स नाईटिंगेल हेल्थ केअर एक्सलन्स अवॉर्ड २०२६ प्रदान करण्यात आला.

हा सन्मान चे संस्थापक व अध्यक्ष हिज एमिनन्स प्रो. डॉ. सर मधु कृष्णन, प्रो. प्रतिमा कृष्णन, प्रो. डॉ. अनिश विजागत आणि सौ. ज्युलिया विजागत यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. मान्यवरांनी आई-मुलीच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या समाजोपयोगी योगदानाचे विशेष कौतुक केले.

यावेळी बोलताना प्रो. डॉ. मधु कृष्णन यांनी मानवसेवेला सर्वोच्च सेवा संबोधत समाजहितासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वे असल्याचे सांगितले. तर प्रो. डॉ. अनिश विजागत यांनी आरोग्यसेवा क्षेत्रातील कार्यकर्त्यांना समाजाचे खरे देवदूत संबोधून त्यांच्या निःस्वार्थ सेवेचा गौरव केला.


एकाच कुटुंबातील आई आणि मुलीला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित पुरस्कार मिळाल्याने परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्य क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या या यशामुळे जालना जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे

# आष्टीत डी.एल.एड.वार्षिक परीक्षा सुरळीत सुरु; शिरूर कासार व आष्टी तालुक्यातील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) शिक्षण क्षेत्रात गुणवत्तापूर्ण आणि संस्कारक्षम शिक्षक घडविणाऱ्या डी.एल.एड. अभ्यासक्रमाच्या वार्षिक परीक्षा २०२६ ला आष्टी शहरात शांततापूर्ण व सुरळीत वातावरणात प्रारंभ झाला आहे. आष्टी येथील अध्यापक विद्यालयाच्या परीक्षा केंद्रावर या परीक्षा घेतल्या जात असून विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये तसेच परीक्षा पारदर्शक व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडावी यासाठी प्रशासनाने अत्यंत काटेकोर नियोजन केले आहे.

शिक्षक होण्याचे स्वप्न उराशी बाळगून डी.एल.एड. अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही परीक्षा अत्यंत महत्त्वाची मानली जाते. या परीक्षेच्या माध्यमातून भावी शिक्षकांच्या ज्ञानाचे, अध्यापन कौशल्यांचे आणि शैक्षणिक गुणवत्तेचे मूल्यमापन केले जात असल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, या परीक्षा केंद्रावर शिरूर कासार तालुक्यातील वारणी येथील कै. तान्हाबाई केदार अध्यापक विद्यालय तसेच आष्टी येथील शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित अध्यापक विद्यालयाच्या मराठी माध्यमाच्या दोन आणि इंग्रजी माध्यमाच्या एका विद्यालयातील विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले आहेत. एकूण तीन अध्यापक विद्यालयांतील विद्यार्थी या केंद्रावर परीक्षा देत असून परीक्षेच्या पहिल्याच



दिवशी विद्यार्थ्यांची उपस्थिती समाधानकारक होती.

आष्टी येथील अध्यापक विद्यालयाच्या प्रशस्त, सुसज्ज आणि सर्व सोयींनी युक्त इमारतीत परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना शांत वातावरणात परीक्षा देता यावी यासाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था, आवश्यक शैक्षणिक सुविधा आणि सुरक्षेच्या दृष्टीने योग्य उपाययोजना करण्यात आल्या आहेत. परीक्षा केंद्र परिसरात शिस्तबद्ध वातावरण असून प्रशासनाच्या नियोजनाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

परीक्षेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, गैरव्यवहारास आळा बसावा आणि परीक्षा पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने पार पडावी यासाठी शिक्षण विभागाने विशेष दक्षता घेतली आहे. परीक्षा केंद्रावर अनुभवी अधिकारी, पर्यवेक्षक व कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली असून संपूर्ण कामकाजावर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे.

या परीक्षा केंद्रावर भाऊसाहेब आहेर हे सहपरिरक्षक म्हणून कार्यरत आहेत. केंद्र संचालक म्हणून प्रकाश सातपुते (मुख्याध्यापक, जिल्हा परिषद मुलांची शाळा, आष्टी) जबाबदारी सांभाळत आहेत. परिरक्षक म्हणून गुणवंत मरेवार हे कार्यरत असून सहकेंद्र संचालक म्हणून आष्टी येथील अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य एस. जी. निशिगंध कार्य पाहत आहेत.

तसेच एस. व्ही. ढवळे, सुनिल कारंजकर, कानिफ हाके, भाऊसाहेब आहेर, बाबासाहेब सांगळे, ज्ञानेश्वर भवर आणि श्रीकांत घायतडक हे पर्यवेक्षक म्हणून जबाबदारी पार पाडत आहेत. परीक्षा केंद्राच्या विविध प्रशासकीय कामकाजासाठी संतोष जाधव व शशिकांत जाधव हे सेवक म्हणून कार्यरत आहेत.

परीक्षेच्या पहिल्या दिवसापासूनच केंद्रावरील व्यवस्थापन, वेळेचे काटेकोर पालन, विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या सूचना आणि परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकता यामुळे परीक्षा सुरळीत सुरू असल्याचे दिसून आले. विद्यार्थ्यांनीही शांत व शिस्तबद्ध वातावरणात परीक्षा दिल्याने केंद्रावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षक होण्याची संधी उपलब्ध करून देणाऱ्या डी.एल.एड. अभ्यासक्रमाच्या या परीक्षा यशस्वीरीत्या पार पडण्यासाठी शिक्षण विभाग, परीक्षा केंद्र प्रशासन, अध्यापक विद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक व कर्मचारी यांचे महत्त्वपूर्ण योगदान असून येणाऱ्या सर्व पेपरही याच शिस्तबद्ध वातावरणात पार पडतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. शिक्षण क्षेत्राला सक्षम, गुणवंत आणि विद्यार्थीकेंद्रित शिक्षक मिळवून देण्याच्या दृष्टीने या परीक्षांना विशेष महत्त्व प्राप्त झाले असून आष्टीतील परीक्षा केंद्र त्यासाठी आदर्श व्यवस्थापनाचे उदाहरण ठरत आहे.

# उद्या महाराष्ट्र पोलीस अकादमीतील १२७ व्या तुकडीचा मंगळवारी दीक्षांत समारंभ

नाशिक / प्रतिनिधी

नाशिक :- महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक येथे वर्षभराचे कठोर प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षकांच्या १२७व्या तुकडीचा दीक्षांत सोहळा मंगळवार ९ जून २०२५ रोजी सकाळी ७ वाजता आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती महाराष्ट्र पोलीस प्रबोधिनी, नाशिक चे उपसंचालक (प्रशासन) नंदकुमार ठाकूर यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये कळविली आहे.

प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षक सत्र क्रमांक १२७ चे प्रशिक्षण ९ जून २०२५ पासून सुरू झाले होते. या तुकडीत महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांसह व गोवा राज्यातून (१ प्रशिक्षणार्थी) निवड झालेल्या एकूण ५८३ प्रशिक्षणार्थीचा समावेश आहे. यामध्ये ४२० पुरुष आणि १६३ महिला प्रशिक्षणार्थीचा सहभाग असून सर्वांनी यशस्वीरित्या प्रशिक्षण पूर्ण केले आहे.

प्रशिक्षणार्थींपैकी सुमारे ८४.३९ टक्के प्रशिक्षणार्थी पदवीधर असून १५.६१ टक्के प्रशिक्षणार्थी पदव्युत्तर शिक्षण घेतलेले आहेत.



वर्षभर चाललेल्या या प्रशिक्षणामध्ये भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, भारतीय साक्ष अधिनियम, स्थानिक व विशेष कायदे, फॉरेन्सिक सायन्स, सायबर गुन्हे, गुन्हेगारी शास्त्र तसेच बाह्य वर्गात कवायत, शारीरिक प्रशिक्षण, गोळीबार सराव आणि योग आदी विषयांचेही विशेष प्रशिक्षण देण्यात आले. महाराष्ट्र पोलीस अकादमीच्या मुख्य कवायत मैदानावर होणाऱ्या दीक्षांत संचलन समारंभास महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक सदानंद दाते हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. ते प्रशिक्षणार्थीकडून मानवंदना स्वीकारतील. तसेच महाराष्ट्र पोलीस अकादमीचे संचालक नवल बजाज हे सर्व प्रशिक्षणार्थीना पद व गोपनीयतेची शपथ देणार आहेत.

सदर दीक्षांत सोहळ्याचे थेट प्रक्षेपण युट्यूब लाईव्हद्वारे करण्यात येणार असून नागरिकांना हा सोहळा ऑनलाईन पाहता येणार आहे, असेही उपसंचालक (प्रशासन) ठाकूर यांनी कळविले आहे.

# साबला येथे शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा

केज: प्रतिनिधी

केज तालुक्यातील साबला येथील ग्रामपंचायत कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त उत्साहपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायतच्या वतीने विविध मान्यवरांच्या उपस्थितीत शिवराज्याभिषेक दिन साजरा करण्यात आला.



कार्यक्रमाची सुरुवात सरपंच जनाबाई नरहरी काकडे यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीताचे गायन करण्यात आले.

यावेळी समाजसेवक नरहरी शहाजी काकडे, युवासेना (शिंदे गट) तालुका प्रमुख दत्तकुमार काकडे यांच्यासह जालिंदर मुळे, गणेश कटारे, विशाल काकडे, गुलाब मुळे, माऊली नाईकनवरे, श्रीमंत नाईकनवरे, राजेभाऊ काकडे, महादेव काकडे, सुरेश शिंदे, बाबासाहेब शिंदे, बाळासाहेब काकडे, धनंजय नाईकनवरे, विष्णू काकडे, रुस्तुम मस्के, अशोक पांचाळ, दशरथ कटारे, आत्माराम काकडे, अंगद काकडे, साहेबराव काकडे, गोरख कटारे, सुरेश नाईकनवरे, विठ्ठल काकडे, अशोक काकडे, सतिश नाईकनवरे, विजय नाईकनवरे, आप्पा काकडे, आश्रुबा नाईकनवरे, छायाचित्रकार राहुल मुळे, नितीन काकडे आदी शिवप्रेमी व शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिवराज्याभिषेक दिनानिमित्त उपस्थितांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचे स्मरण केले. देशभक्ती, स्वराज्य आणि लोककल्याणकारी शासनव्यवस्थेचा आदर्श समाजासमोर ठेवणाऱ्या शिवरायांच्या कार्याचा वारसा जपण्याचा संकल्प यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला.

कार्यक्रम शांततापूर्ण आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. गावातील शिवप्रेमींच्या मोठ्या सहभागामुळे शिवराज्याभिषेक दिनाला विशेष उत्साहाचे स्वरूप प्राप्त झाले.

# उद्योगांनी तेल कंपन्यांसमवेतचे खरेदी करार पुनर्संचयित करावेत - जिल्हाधिकारी आयुष प्रसाद

नाशिक शांतारामभाऊ दुनबळे
दै महाभारत

नाशिक :- उद्योगांनी किरकोळ पंपावरून होणारी व्यावसायिक इंधन खरेदी तत्काळ थांबवून शासन निर्णयानुसार तेल कंपन्यांसमवेतचे थेट अधिकृत खरेदी करार पुनर्संचयित करावेत. तेल कंपन्यांनी किरकोळ विक्री केंद्रांवर नियमांचे पालन सुनिश्चित करीत थेट खरेदी करणाऱ्या औद्योगिक ग्राहकांना विनाविलंब इंधन उपलब्ध करून द्यावे, अशी सूचना जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी केली.

जिल्ह्यातील इंधन पुरवठ्याची सद्यःस्थिती समजून घेत उद्योगांच्या अडचणी जाणून घेणे व उद्योग व तेल कंपन्यांमध्ये संवाद साधण्यासाठी जिल्हाधिकारी श्री. प्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात नुकतीच सकाळी बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी रमेश गायकवाड,औद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी




दीपक पाटील, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक चेतन पाटील यांच्यासह विविध औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी, सार्वजनिक क्षेत्रातील प्रमुख तेल कंपन्या इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लिमिटेड, हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडचे वरिष्ठ प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. प्रसाद म्हणाले की, खरीप हंगाम आणि तातडीच्या गरजा पाहता जिल्ह्यातील शेतकरी, सर्वसामान्य नागरिक आणि वाहनधारकांना पेट्रोल व डिझेलचा पुरवठा कोणत्याही परिस्थितीत कमी पडणार नाही याची दक्षता घेण्यात येईल. तेल कंपन्यांनी किरकोळ विक्री केंद्रांवर नियमांचे पालन सुनिश्चित करावे आणि थेट खरेदी करणाऱ्या औद्योगिक ग्राहकांना विनाविलंब इंधन उपलब्ध करून द्यावे. या संपूर्ण प्रक्रियेवर आणि जिल्ह्यातील इंधन वितरणावर लक्ष ठेवण्यासाठी जिल्हा पुरवठा विभागाच्या विशेष तपासणी पथकांद्वारे प्रत्यक्ष पडताळणी केली जाईल. यावेळी उद्योग संघटना आणि कंपन्यांच्या प्रतिनिधींनी प्रशासनाच्या भूमिकेला सकारात्मक प्रतिसाद देत शासकीय नियमांचे व शासन निर्णयांचे पालन करून पूर्ण सहकार्याची ग्वाही दिली.

यावेळी मागील वर्षाच्या तुलनेत किरकोळ पेट्रोल पंपांवरील विक्रीत ३६ टक्के वाढ आणि औद्योगिक घाऊक खरेदीत ५० टक्क्यांची घट झाल्याची माहिती देण्यात आली. या पार्श्वभूमीवर उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधींना शासनाच्या नियमांविषयी माहिती देण्यात आली. व्यावसायिक आणि औद्योगिक वापरासाठी किरकोळ पेट्रोल पंपांवरून इंधन उचलण्याऐवजी दि मोटार स्पिरीट अॅण्ड हायस्पीड डिझेल आदेश, राज्य शासनाच्या १९ जुलै २०११ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदी आणि मा. सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार तेल कंपन्यांच्या थेट अधिकृत वाहिनीद्वारेच इंधन खरेदी करणे बंधनकारक आहे, अशी माहिती देण्यात आली.

# ग्रामपंचायतीच्या पाच टक्के निधीतून दत्तनगर गल्लीत लावलेल्या आंब्याच्या झाडांना फळे

**वृक्षारोपण करून झाडे जगविल्यास मिळते निसर्गाचे गोड फळ - सामोडे येथील दत्तनगर गल्लीचा आदर्श**

नगर प्रतिनिधी :

सामोडे येथील दत्तनगर गल्लीत ग्रामपंचायतीच्या पाच टक्के निधीतून काही वर्षांपूर्वी आंब्याची झाडे लावण्यात आली होती. या झाडांची परिसरातील प्रत्येक घरमालकांनी आपल्या घरातील सदस्याप्रमाणे काळजी घेतली. वेळोवेळी पाणी देणे, संरक्षण करणे आणि निगा राखणे यामुळे आज या आंब्याच्या झाडांना फळे लागली आहेत.



दत्तनगर गल्लीत लावलेल्या या आंब्याच्या झाडांपैकी काही झाडांना कैऱ्या आल्या असून, परिसरातील नागरिकांना आता घरच्या झाडावरील कैरीचे लोणचे खाण्याचा आनंद मिळणार आहे.

ग्रामपंचायतीने निधीतून केलेले वृक्षारोपण आणि नागरिकांनी घेतलेली झाडांची काळजी यामुळे हा सुंदर परिणाम दिसून आला आहे.

झाडे लावणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच ती झाडे जगविणेही काळाची गरज आहे, याचा उत्तम संदेश दत्तनगर गल्लीतील नागरिकांनी आपल्या कृतीतून दिला आहे. पर्यावरण संरक्षण, सावली, शुद्ध हवा आणि फळे अशा अनेक माध्यमांतून झाडे माणसाचे जीवन समृद्ध करतात.

त्यामुळे प्रत्येक नागरिकांनी वृक्षारोपण करून त्याची योग्य काळजी घ्यावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

यावेळी आंबे तोडताना पत्रकार दिलीप घरटे उपस्थित होते. दत्तनगर गल्लीतील नागरिकांनी झाडांची घेतलेली काळजी इतरांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# आरोग्य विभागात समुपदेशनाद्वारे ४,१९३ कर्मचाऱ्यांच्या पारदर्शक बदल्या

## आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली विभागाची प्रभावी अंमलबजावणी

मुंबई/ पुणे प्रतिनिधी

सार्वजनिक आरोग्य विभागातील गट-क संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदली प्रक्रियेत यंदा प्रथमच समुपदेशनाधारित, पारदर्शक आणि तंत्रशुद्ध पद्धतीचा अवलंब करण्यात आला. राज्यातील एकूण ४,५०६ बदलीपात्र कर्मचाऱ्यांपैकी ४,१९३ कर्मचाऱ्यांच्या बदल्यांसाठी शिफारसी करण्यात आल्याने ही प्रक्रिया राज्य प्रशासनातील एक आदर्श उपक्रम म्हणून पुढे आली आहे.

आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली ही प्रक्रिया राबविण्यात आली. कर्मचाऱ्यांच्या सेवा ज्येष्ठता, पसंतीक्रम, दुर्गम भागातील सेवा, वैद्यकीय व कौटुंबिक परिस्थिती यांचा विचार करून बदली प्रक्रिया पार पडल्याने राज्यभरातील कर्मचाऱ्यांमध्ये विश्वास, समाधान आणि सकारात्मकतेचे वातावरण निर्माण झाले आहे.आरोग्य विभागाचे प्रधान सचिव ,सचिव -२ ,आयुक्त आरोग्य सेवा यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक आरोग्य सेवा (प्राथमिक) यांच्या प्रशासकीय नियोजनातून संपूर्ण प्रक्रियेचे बारकाईने नियोजन करण्यात आले. प्रत्येक परिमंडळासाठी स्वतंत्र वेळापत्रक, मार्गदर्शक सूचना, व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, हरकतींचे तत्काळ निवारण आणि प्रक्रियेचे व्हिडिओ चित्रीकरण यामुळे पारदर्शकता आणि विश्वासार्हता सुनिश्चित करण्यात यश आले.

परिमंडळ कार्यक्रम प्रमुख, तसेच राज्यस्तरीय कार्यक्रम प्रमुख यांच्या उपस्थितीत स्तरावरील बदल्या समन्वयातून करण्यात आल्या. राज्यातील छत्रपती संभाजीनगर, नागपूर, अकोला, नाशिक, कोल्हापूर, पुणे, लातूर आणि ठाणे या परिमंडळांसह विविध विशेष आरोग्य संस्थांमध्ये १३ ते २३ मे २०२६ दरम्यान समुपदेशन प्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण झाली.



उपलब्ध आकडेवारीनुसार संभाजीनगर,नागपूर, नाशिक, पुणे, लातूर, कोल्हापूर, अकोला आणि ठाणे या सर्व परिमंडळांमध्ये मोठ्या प्रमाणावर बदली शिफारसी करण्यात आल्या असून प्रक्रिया सुरळीत आणि वादविरहितपणे पार पडली.

राज्यातील आरोग्य सेवा अधिक सक्षम, गतिमान आणि परिणामकारक करण्याच्या दिशेने हा उपक्रम एक महत्त्वाचे पाऊल मानला जात आहे. यावर्षी बदली प्रक्रियेत कर्मचाऱ्यांचाही चांगला प्रतिसाद व सहकार्य मिळाले त्यामुळे या बदल्या अधिक नियोजनबद्ध व सर्वांच्या सहयोगामुळे पारदर्शकपणे विभागाला करता आल्या अशी भावना संचालक ,आरोग्य सेवा (प्राथमिक )डॉ.विजय कंदेवाड यांनी व्यक्त केली आहे.

# शिवराज्याभिषेक सोहळा साजरा न करणाऱ्या ग्रामपंचायतींवर कारवाई करा – किसन पाटील



माजलगाव ।प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराजांचा शिवराज्याभिषेक दिन (शिवस्वराज्य दिन) ६ जून रोजी संपूर्ण महाराष्ट्रातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये साजरा करणे बंधनकारक असतानाही, जे लोकप्रतिनिधी किंवा ग्रामसेवक हा सोहळा साजरा करणार नाहीत, त्यांच्यावर तात्काळ कडक प्रशासकीय कारवाई करण्यात यावी, अशी मागणी जागर प्रतिष्ठानचे अध्यक्ष किसन पाटील यांनी केली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास व पंचायत राज विभागाने १ जानेवारी २०२१ रोजी जारी केलेल्या अधिकृत शासन निर्णयानुसार दरवर्षी ६ जून रोजी सर्व ग्रामपंचायतींमध्ये 'शिवस्वराज्य दिन' साजरा करणे कायदेशीररीत्या बंधनकारक आहे.या दिवशी सकाळी ग्रामपंचायत कार्यालयासमोर अधिकृतरीत्या जरीची किनार असलेला शुद्ध भगवा ध्वज लावून स्वराज्यगुढी उभारणे अनिवार्य आहे.गुढी उभारल्यानंतर सर्व अधिकारी, कर्मचारी आणि ग्रामस्थांच्या उपस्थितीत राष्ट्रगीत आणि 'जय जय महाराष्ट्र माझा' या राज्यगीताचे गायन करणे बंधनकारक आहे. या कार्यक्रमाच्या खर्चासाठी ग्रामपंचायतींना स्वतःच्या उत्पन्नातून किंवा १५ व्या वित्त आयोगाच्या प्रशासकीय निधीतून खर्च करण्याची अधिकृत परवानगी देण्यात आली आहे.कारवाई न केल्यास शासकीय निधी आणि स्पष्ट आदेश उपलब्ध असतानाही जर एखादी ग्रामपंचायत शिवस्वराज्य दिन साजरा करत नसेल, तर तो थेट छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा आणि शासकीय आदेशाचा अवमान आहे, असे किसन पाटील यांनी म्हटले आहे. अशा दोषी ग्रामपंचायतींचे सरपंच आणि ग्रामसेवकांवर तात्काळ प्रशासकीय कारवाई करून त्यांच्याकडून खुलासा मागवण्यात यावा. प्रशासनाने यावर तात्काळ पावले उचलली नाहीत, तर 'जागर प्रतिष्ठान'च्या वतीने राज्यभरात पंचायत समिती आणि जिल्हा परिषद कार्यालयांसमोर तीव्र निदर्शने आणि लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, असा इशारा किसन पाटील यांनी दिला आहे.

# विरखेडा गावचा सुपुत्र 'निलेश भालके' याची भारतीय सैन्यात निवड; गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा



प्रतिनिधी:- जाफराबाद

तालुक्यातील विरखेडा येथील एका सामान्य कुटुंबातील तरुण निलेश विजय भालके याची भारतीय सैन्यात निवड झाली आहे. त्याच्या या दैदिप्यमान यशामुळे विरखेडा गावासह संपूर्ण जाफराबाद तालुक्यात आनंदाचे वातावरण पसरले असून, निलेशवर सर्व स्तरांतून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

निलेशची घरची परिस्थिती अत्यंत साधी आहे. मात्र, देशसेवेचे स्वप्न उराशी बाळगून त्याने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत हे यश संपादन केले. कोणतीही मोठी पार्श्वभूमी नसताना केवळ स्वतःची जिद्द, चिकाटी, अहोरात्र मेहनत आणि देशसेवेची तीव्र तळमळ याच्या जोरावर त्याने भारतीय लष्कराची कठीण परीक्षा व मैदानी चाचणी उत्तीर्ण केली.निलेश भालके यांची यशाची बातमी विरखेडा गावात पोहोचताच गावकऱ्यांनी एकच जल्लोष केला. आपल्या गावातील एका ग्रामीण तरुणाने देशाच्या संरक्षणासाठी घेतलेली ही झेप आम्हा सर्व गावकऱ्यांसाठी अत्यंत अभिमानास्पद आहे, अशा भावना ग्रामस्थांनी व्यक्त केल्या. निलेशच्या या यशामुळे गावातील इतर तरुण पिढीलाही देशसेवेची आणि खडतर परिश्रमाची एक नवी प्रेरणा मिळाली आहे



मुखेड – हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, रयतेचे राजे, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त ग्रामपंचायत कार्यालय उंद्री प.दे. ता. मुखेड येथे शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात साजरा करून विनम्र अभिवादन करण्यात आले. (छाया मनोज बिरादार)

# सोयगाव तालुक्यात अवैध वाळू-मुरुम उपशाचा सुळसुळाट; महसूल, वन व लघुसिंचन विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह

सोयगाव / प्रतिनिधी

सोयगाव तालुक्यातील गलवाडा (अ), वेताळवाडी, रायरी, धिंगापूर, निंबायती, रामपुरा, फरदापूर, जामठी, सावळदबारा, बनोटी, नायगाव, वाडी, पळाशी, घोरकुंड, गोंदेगाव, तिडका, किन्ही आदी भागांतील नदी-नाल्यांच्या पात्रातून मोठ्या प्रमाणात अवैधरित्या वाळूचा उपसा करून वाहतूक केली जात असल्याचे चित्र दिसून येत आहे. महसूल विभागाकडून या प्रकाराकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.

दरम्यान, सोयगाव पोलीस ठाण्याचा नुकताच पदभार स्वीकारलेले सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर गोरे यांनी चोरटी वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर कारवाई करून प्रशासनात खळबळ उडवली आहे. मात्र महसूल विभागाकडून अपेक्षित कारवाई होत नसल्याने अवैध उत्खनन करणाऱ्यांचे मनोबल वाढल्याची चर्चा आहे.

महसूल प्रशासनाने जून महिन्यासाठी तहसीलदारांच्या आदेशाने भरारी पथकाची स्थापना केली असली तरी सात दिवस उलटूनही या पथकाकडून कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. भरारी पथकातील मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी व कोतवाल हे स्थानिक स्तरावर राहत नसल्यामुळे हे पथक केवळ कागदोपत्री असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. नोकरी शासनाची आणि चाकरी वाळूमाफियांची अशी संतप्त प्रतिक्रिया परिसरातून व्यक्त होत आहे.



तालुक्यात दिवस-रात्र ट्रॅक्टर, ट्रॉली आणि हायवा वाहनांद्वारे वाळू व मुरूमाची सर्रास वाहतूक सुरू असून शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत असल्याचा दावा करण्यात येत आहे. विशेष म्हणजे अनेक वाहनांवर प्रादेशिक परिवहन विभागाकडून देण्यात आलेले नोंदणी क्रमांकही स्पष्टपणे नमूद नसल्याचे आढळून येत आहे. जळगाव जिल्ह्यातूनही रात्रीच्या वेळी वाळूची वाहतूक होत असल्याची चर्चा असून अशा वाहनांवर कारवाई कोण करणार, हा प्रश्न अनुत्तरित राहिला आहे.

महसूल भरारी पथकावर नागरिकांचा रोष

तहसील कार्यालयाचे भरारी पथक प्रत्यक्षात निष्क्रिय असून अवैध गौण खनिज वाहतूक करणाऱ्यांवर कोणतीही कारवाई होत नसल्याने अशा प्रकरणांमध्ये वाढ होत असल्याचा आरोप होत आहे. भरारी पथक प्रमुखांसह संबंधित कर्मचारी व ग्राम महसूल अधिकारी अपडाऊन करत असल्याने रात्रीच्या काळात कोणतीही प्रभावी देखरेख होत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. यामुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत असून विभागीय आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांनी याकडे गांभीर्याने लक्ष देऊन संबंधितांची चौकशी करून कारवाई करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

वनविभागाच्या भूमिकेवरही संशय

सोयगाव वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी वनक्षेत्रातून गौण खनिज वाहतुकीची कोणतीही परवानगी दिलेली नसल्याचे सांगितले जाते. मात्र बनोटी परिसरालगतच्या नायगाव, वाडी, पळाशी, वरठाण, तिडका आणि नांदगाव येथील वनक्षेत्रातून मोठ्या प्रमाणात गौण खनिजाची वाहतूक होत असल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

यामुळे वनसंपदेची हानी व तस्करीची शक्यता वाढली असून संबंधित वनपरिमंडळ कार्यालयाकडून अनेक वर्षांत एकदाही ठोस कारवाई न झाल्याने आर्थिक हितसंबंध असल्याची चर्चा परिसरात रंगत आहे.

पिंपरी पाझर तलावातून मुरूम उत्खनन?

जरंडी-पिंपरी मार्गालगत असलेल्या जिल्हा परिषद लघुसिंचन विभागाच्या पिंपरी पाझर तलावातून पोकलेन मशीनच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणावर मुरूम उत्खनन करून हायवा वाहनांद्वारे वाहतूक केली जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या संदर्भात तहसीलदार मनीषा मेने-जोगदंड, नायब तहसीलदार, लघुसिंचन विभागाचे कनिष्ठ अभियंता पीयूष शिंपी तसेच उपविभागीय अभियंता रुचिका घोगरे यांना माहिती देण्यात आली असल्याचे सांगितले जाते. मात्र अद्याप कोणतीही कारवाई झालेली नसल्याने संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

जिल्हास्तरीय विशेष पथकाची मागणी

तालुक्यात वाढत्या अवैध वाळू व गौण खनिज उत्खननाला आळा घालण्यासाठी नवनियुक्त जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी जिल्हास्तरीय विशेष भरारी पथकाची स्थापना करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे. अवैध उत्खननामुळे पर्यावरणीय हानीबरोबरच शासनाच्या महसुलालाही मोठा फटका बसत असल्याने प्रशासनाने तातडीने पावले उचलण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

# गंगामाऊली शुगरकडून शेतकऱ्यांच्या खात्यावर पेरणीसाठी १२० रुपये प्रतिटन हप्ता जमा

चेअरमन लक्ष्मणराव मोरे यांच्या निर्णयाचे शेतकरी वर्गातून स्वागत

केज: प्रतिनिधी

केज तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी दिलासादायक बातमी म्हणजे गंगामाऊली शुगर कारखान्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यावर पेरणीसाठी १२० रुपये प्रतिटन प्रमाणे दुसरा हप्ता जमा केला आहे. यामुळे खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळाल्याने समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

मागील तीन गळीत हंगामांपासून कार्यरत असलेल्या गंगामाऊली शुगरने अल्पावधीतच शेतकरी, ऊसतोड मजूर आणि वाहतूकदारांचा विश्वास संपादन केला आहे. सुरुवातीच्या काळात कारखान्याच्या कार्यक्षमतेबाबत अनेक शंका उपस्थित केल्या जात होत्या. मात्र वेळेवर देयके आणि पारदर्शक कारभारामुळे हा विश्वास अधिक दृढ झाला आहे.

कारखान्याने यंदाच्या गळीत हंगामात शेतकऱ्यांना २७०० रुपये प्रतिटन पहिली उचल दिली होती. त्यानंतर पेरणीच्या हंगामात शेतकऱ्यांना मदत व्हावी या उद्देशाने १२० रुपये प्रतिटन दुसरा हप्ता त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आला असल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन लक्ष्मणराव मोरे यांनी दिली.

कारखान्याकडून दर पंधरा दिवसांनी रोख बिले दिली जात असल्याने शेतकऱ्यांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे. केवळ साखर उत्पादनावर आधारित असतानाही शेतकऱ्यांना वेळेत आणि योग्य दराने पैसे देण्याची परंपरा गंगामाऊली शुगरने कायम ठेवली आहे.

पेरणीच्या महत्त्वाच्या काळात आर्थिक मदत उपलब्ध झाल्याने शेतकरी वर्गातून समाधान व्यक्त करण्यात येत असून, शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावरचे हास्य हाच आमचा नफा ही भूमिका कारखाना व्यवस्थापनाने प्रत्यक्ष कृतीतून सिद्ध केल्याची भावना अनेक शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

यामुळे गंगामाऊली शुगरवरील शेतकऱ्यांचा विश्वास दिवसेंदिवस अधिक दृढ होत असून, कारखान्याच्या या निर्णयाचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे.

# धडक कारवाईने अवैध धंदेवाल्यांचे धाबे दणाणले; सोयगाव पोलिसांची एकाच दिवशी तीन मोठ्या कारवाया

सोयगाव / प्रतिनिधी

सोयगाव पोलिस ठाण्याचे नवनियुक्त सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर गोरे यांनी पदभार स्वीकारताच अवैध धंद्यांविरोधात धडक कारवाईची मोहीम सुरू केली असून, त्यांच्या नेतृत्वाखाली शनिवारी एकाच दिवशी तीन महत्त्वाच्या कारवाया करण्यात आल्या. या कारवाईमुळे अवैध वाळू वाहतूक, गावठी दारू विक्री आणि मटका जुगार चालविणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

सोयगाव तालुक्यात गेल्या काही वर्षांपासून अवैधरित्या गौण खनिज उत्खनन व वाळूची चोरटी वाहतूक मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याच्या तक्रारी होत होत्या. या बेकायदेशीर प्रकारांमुळे शासनाच्या महसुलाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत असल्याचे बोलले जात आहे. मात्र संबंधित महसूल विभागाकडून अपेक्षित कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते.

अशा परिस्थितीत सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस कर्मचारी गजानन दांडगे यांनी शनिवारी सायंकाळी सुमारे ४.४५ वाजण्याच्या सुमारास गलवाडा रस्त्यावरील अजिंठा व्हॅली स्कूलजवळ अवैधरित्या वाळू वाहतूक करणारा ट्रॅक्टर पकडून जप्त केला. या प्रकरणी रामचंद्र तायडे (वय ४५, रा. गलवाडा) यांच्याविरुद्ध तसेच संबंधित ट्रॅक्टरवर मोटार वाहन कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याच दिवशी सोयगाव पोलिसांनी घोसला येथील जोगेश्वरी धरणाच्या पायथ्याशी सुरू असलेल्या गावठी दारूच्या अड्ड्यावर छापा टाकून सुमारे २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईप्रकरणी रमजान शब्बीर तडवी (वय ५०, रा. घोसला) याच्याविरुद्ध पोलिस



कर्मचारी सादिक तडवी यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच सोयगाव शहरातील पोलिस ठाण्याच्या हाकेच्या अंतरावर सुरू असलेल्या कल्याण मटका जुगार अड्ड्यावरही पोलिसांनी छापा टाकला. या प्रकरणी पोलीस हेड कॉन्स्टेबल नारायण जिरी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नारायण खैरनार याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, या तिन्ही कारवाया एकाच दिवशी करण्यात आल्याने अवैध धंदे करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. तत्कालीन अधिकाऱ्यांच्या कार्यकाळात पोलिस ठाण्याच्या हद्दीत विविध अवैध व्यवसाय, चोरटी वाळू वाहतूक आणि गौण खनिजांचे बेकायदेशीर उत्खनन सुरू असल्याच्या तक्रारी वारंवार होत होत्या. मात्र नव्या नेतृत्वाखाली पोलिस प्रशासनाने कठोर भूमिका घेतल्याचे या कारवायांमधून स्पष्ट झाले आहे.

दरम्यान, पोलिसांनी सुरू केलेल्या या मोहिमेमुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण असून, अवैध धंद्यांवर कायमस्वरूपी आळा बसावा अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तसेच महसूल विभागानेही अवैध गौण खनिज उत्खनन आणि वाळू वाहतुकीविरोधात प्रभावी कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# केज नगर पंचायतचे गटनेते हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ.सिताताई बनसोड यांच्या पाठपुराव्याला यश

केज/प्रतिनिधी

केज शहरातील मागील चार ते साडे चार वर्षा पासून सार्वजनिक विकास कामांना गती मिळत असतांना एक अत्यंत महत्त्वपूर्ण घटना प्रत्यक्षात अनेक दिवसांच्या प्रयत्नानंतर गेल्या अनेक दिवसां पासून प्रलंबित असलेला केज येथील छोट्या व्यवसाय धारकांच्या व्यवसायाच्या जागेचा प्रश्न मिटला आहे अशी माहिती पत्रकार परिषदे मध्ये गटनेते हारुणभाई इनामदार यांनी दिली आहे.जिरायत खात्याची शासकीयजागा अधिकृत पणे केज नगरपंचायत प्रशासनाच्या ताब्यात देण्यात आली आहे. जागेचे ताबा पत्र महसूल प्रशासनाने अधिकृतपणे केज नगरपंचायत ला हस्तांतरित केले आहे. नगरपंचायत प्रशासना च्या वतीने मंगळवार, दिनांक ४ जून २०२६ रोजी ही हस्तांतरण प्रक्रिया अत्यंत पारदर्शक पणे पूर्ण करण्यात आली असून राष्ट्रवादी काँग्रेसचे कै.अजित दादा पवार, पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा गटनेते हारुणभाई इनामदार व केज नगर पंचायतच्या नगराध्यक्षा सौ.सिताताई बनसोड यांच्या पाठपुराव्यामुळे आणि सर्व राजकीय वरीष्ठांच्या सहकार्याने

केज नगरपंचायतीला यश प्राप्त झाले आहे अशी प्रतिक्रिया नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड व गटनेते हारूणभाई इनामदार यांनी सदर जागेचा ताबा घेते वेळी माध्यमांशी बोलताना प्रतिक्रिया दिली आहे.यासाठी गटनेते हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सिताताई बनसोड यांनी सर्व वरिष्ठांना आणि नगरसेवकांना विश्वासात घेऊन सातत्याने शासन व प्रशासन स्तरावर पाठपुरावा केला,त्यांच्या या पाठपुराला यश येऊन गोरगरीब छोट्या व्यवसायिकांना आधार मिळाला आहे.केज शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या या जागेचा वापर जनहिता साठी व्हावा,यासाठी या दोन्ही नेत्यांनी सर्व कायदेशीर आणि प्रशासकीय बाबींची पूर्तता करून या महत्त्वपूर्ण कामात केजच्या विकासासाठी स्व.लोकनेते विलासराव देशमुख,माजी खासदार रजनीताई पाटील,स्व. विमलताई मुंदडा,आणि विद्यमान खासदार बजरंग बप्पा सोनवणे, विद्यमान आमदार नमिताताई मुंदडा,ज्येष्ठ नेते रमेशरावजी आडसकर,कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अंकुशराव इंगळे यांचे व अप्रत्यक्ष नेतेमंडळीचे मोलाचे सहकार्य लाभले.त्याच बरोबर केज नगरपंचायत चे मुख्याधिकारी,नगर सेवक व सर्व कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.सर्वांच्या विशेष प्रयत्नांमुळे हस्तांतरणाचे आदेश तातडीने निघण्यास मोठी मदत झाली आहे अशा प्रतिक्रिया प्रसार माध्यमांशी बोलताना इनामदार व बनसोड यांनी दिल्या आहेत.

या महत्त्वाकांक्षी प्रकल्पा साठी आणि शासकीय जागा हस्तांतरणाच्या प्रक्रियेसाठी राज्याचे दिवंगत नेतृत्व ना.अजित दादा पवार यांचे अत्यंत मोलाचे सहकार्य व खंबीर मार्गदर्शन लाभले. तसेच जिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी दिपक वजाळे यांनी शासकीय पातळी वरील अनेक तांत्रिक व प्रशासकीय अडचणी दूर करण्या साठी विशेष लक्ष देऊन मोलाचे सहकार्य केले. या महत्त्वपूर्ण योगदाना बद्दल केज नगर पंचायती च्या वतीने कै.अजित दादा पवार आणि जिल्हाधिकारी साहेब व उप जिल्हाधिकारी दिपक वजाळे साहेब यांचे जाहीर आभार तमाम केज वासियांच्या वतीने व केज नगर पंचायतच्या वतीने गटनेते हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांनी मानले आहे.ही जागा केज नगर पंचायतीला हस्तांतरित होण्याच्या संपूर्ण प्रक्रियेमध्ये दिवंगत तहसीलदार राकेश गिड्डे साहेब यांचे योगदान अत्यंत मोलाचे राहिले आहे.त्यांनी आपल्या कार्यकाळात या प्रकरणातील सर्व कायदेशीर अडचणी दूर करून प्रशासकीय प्रक्रियेला गती दिली होती,ज्याची आज या प्रसंगी कृतज्ञतेने आठवण काढण्यात



आली.कागदपत्रांची अचूक पडताळणी आणि ताबा पावती तयार करण्यापासून ते प्रत्यक्ष हस्तांतरणापर्यंत अहोरात्र कष्ट घेऊन अतिशय मोलाचे सहकार्य केले.या दोन्ही महसूल अधिकाऱ्यांच्या सकारात्मक भूमिकेमुळे हा महत्वाचा प्रश्न मार्गी लागला असून केज शहराच्या विकासाला नवी दिशा मिळणार असून रस्त्याच्या कडेवर बसुन हातावर पोट भरणाऱ्या व्यवसायीकांच्या जिव्हाळ्याचा मोठा प्रश्न मिटणार आहे.मागील चाळीस वर्षापासून जी फरफट व्यवसाय धारकांची चालू होती ती आता मिटणार असून केजच्या विकासात एक महत्त्वाचा टप्पा आपल्या कार्यकाळात पूर्ण होत असल्याचा आनंद होत असून या कामी आजी, माजी,सर्व राजकीय नेत्यांचे तसेच अधिकाऱ्यांचे आभार इनामदार व बनसोड यांच्याकडून मानण्यात आले.याकामी सर्व यंत्रणा अगदी पारदर्शक पणे राबवून छोट्या व्यवसाय धारकांच्या रोजी रोटीचा प्रश्न तात्पुरता मिटणार आहे यामुळे केज शहर वासियांकडुन तसेच व्यवसाय धारक आणि नागरिकांमधून आनंद व्यक्त केला जात आहे. जनविकास आघाडीचे सर्वेसर्वा हारुणभाई इनामदार,नगराध्यक्षा सौ.सिताताई बनसोड यांच्या अथक प्रयत्नांमुळे आणि कै.अजितदादा पवार,खासदार बजरंग बप्पा सोनवणे व मा.खा. रजनीताई पाटील यांच्या पाठबळामुळे,तसेच उप जिल्हाधिकारी वजाळे साहेब,दिवंगत तहसील दार राकेश गिड्डे साहेब व तलाठी साहिल इनामदार यांच्या प्रशासकीय सहकार्यामुळे केज नगरपंचायतीलाहक्काची जागा मिळाली आहे.या जागेवर सार्वजनिक प्रकल्प,छोट्या व्यवसाय धारकांसाठी तात्पुरते दुकान आदी प्रश्न मिटणार आहेत तसेच प्रशासकीय इमारत तसेच नागरिकांसाठी उपयुक्त सुविधा उभारण्याचा मार्ग मोकळा झाला असून, व्यवसायधारकांनी तसेच केज वासीयांनी गट नेते हारुणभाई इनामदार, नगरपंचायत च्या विद्यमान नगराध्यक्षा सौ. सिताताई बनसोड आणि सर्व नेत्यांचे तसेच महसूल प्रशासनाचे जाहीर आभार मानले आहेत.या पत्रकार परिषदेला ज्येष्ठ नेते हारूणभाई इनामदार, नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड,जनविकास परिवर्तन आघाडीचे गट नेते राजूभाई इनामदार, नगरसेवक जलालभाई इनामदार,लखन हजारे, व्यापारी प्रतिनिधी महेश जाजू यांच्यासह अन्य पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

# शिवराज्याभिषेक सोहळ्यात सामाजिक कार्यकर्ते श्री.यशवंत खंडागळे यांना अभिषेकाचा मान

## आयुष्यातील अविस्मरणीय क्षण असल्याची भावना

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पवित्र शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त आष्टी शहरात आयोजित करण्यात आलेल्या भव्य कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमचे बीड जिल्हाध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते श्री. यशवंत खंडागळे यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीला अभिषेक करण्याचा मान मिळाल्याने त्यांनी यास आपल्या आयुष्यातील सर्वात अविस्मरणीय आणि भावूक करणारा क्षण असल्याची भावना व्यक्त केली आहे.

आष्टी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवराज्याभिषेक दिनानिमित्त मोठ्या उत्साहात विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यास आष्टी मतदारसंघाचे लोकप्रिय



आमदार, लोकनेते, मराठवाडा भूषण सुरेश (आण्णा) धस यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. शिवप्रेमी, सामाजिक कार्यकर्ते, विविध संघटनांचे पदाधिकारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमात श्री. यशवंत खंडागळे यांना महाराजांच्या मूर्तीवर अभिषेक करण्याची संधी मिळाली. अभिषेक विधी दरम्यान त्यांनी अत्यंत श्रद्धा आणि भक्तिभावाने पूजा-अर्चा केली. या प्रसंगी उपस्थित शिवभक्तांनी छत्रपती शिवाजी महाराज की जय च्या घोषणांनी परिसर दणाणून सोडला होता. याबाबत भावना व्यक्त करताना यशवंत खंडागळे म्हणाले की, महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या निमित्ताने मला अभिषेक करण्याची सुवर्णसंधी मिळाली. माझ्यासारख्या एका सामान्य कार्यकर्त्याला हा सन्मान मिळणे ही माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे. हा क्षण माझ्या आयुष्यातील सर्वात अविस्मरणीय आणि भावनांनी भरलेला क्षण आहे. माझे दैवत आदरणीय आमदार सुरेश आण्णा धस आणि सर्व शिवप्रेमी बांधवांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

श्री. खंडागळे हे सामाजिक आणि जनहिताच्या विविध उपक्रमांमध्ये सक्रियपणे सहभागी होत असतात. समाजातील वंचित घटकांसाठी सातत्याने काम करणारे सामाजिक कार्यकर्ते म्हणून त्यांची ओळख आहे. त्यामुळे त्यांना मिळालेला हा सन्मान अनेकांच्या दृष्टीने त्यांच्या सामाजिक कार्याची पावती मानला जात आहे.

शिवराज्याभिषेक दिन हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा दिवस मानला जातो. या दिवसानिमित्त राज्यभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. आष्टी येथेही पारंपरिक पद्धतीने पूजा, अभिषेक, शिवगर्जना, इतिहासप्रेमींची उपस्थिती आणि शिवभक्तांचा उत्साह यामुळे सोहळ्याला विशेष रंगत प्राप्त झाली. श्री. यशवंत खंडागळे यांना मिळालेला अभिषेकाचा मान हा केवळ त्यांच्यासाठीच नव्हे तर त्यांच्या सहकाऱ्यांसाठी, मित्रपरिवारासाठी आणि समाजातील

# मिरची व्यापाऱ्याच्या हत्येप्रकरणी दोन संशयित आरोपी जेरबंद

## न्यायालयाकडून चार दिवसांची पोलीस कोठडी; पोलिसांची धडाकेबाज कारवाई

जाफराबाद :- प्रतिनिधी

जाफराबाद शहरातील मिरची व्यापारी शेख मोहसीन शेख मजीद (वय ४६) यांच्या निर्घृण हत्येप्रकरणी जाफराबाद पोलिसांनी अवघ्या काही दिवसात संशयित आरोपींना अटक करून तपासाला वेग दिला आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींना न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्यांना चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

या प्रकरणात महेश ज्ञानदेव सोनवणे (वय २५) आणि निलेश संजय पवार (वय २५), दोघेही रा. सिंदखेडराजा, यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.मिरची व्यापारी शेख मोहसीन यांच्या हत्येनंतर आरोपी फरार झाले होते. दरम्यान, आरोपी सिंदखेडराजा परिसरात असल्याची गोपनीय माहिती जाफराबाद पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक राजधर पठाडे यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक तातडीने रवाना करण्यात आले.

तपासादरम्यान आरोपी एका



बिअर बारमध्ये थांबल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसतेथे पोहोचताच ते तेथून जंगलाच्या दिशेने गेले. मात्र पोलिसांनी त्यांचा सातत्याने पाठलाग सुरू ठेवला. जंगल परिसरात शोधमोहीम राबविल्यानंतर आरोपी पुन्हा सिंदखेडराजा शहरात परतल्याचे निष्पन्न झाले.यावेळी आरोपी एका मटण दुकानात खरेदीसाठी गेले असताना जाफराबाद पोलिसांनी सिंदखेडराजा पोलिसांच्या मदतीने सापळा रचला. या कारवाईत एका आरोपीला घटनास्थळीच ताब्यात घेण्यात आले, तर दुसऱ्या आरोपीने पळून जाण्याचा



प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी पाठलाग करून त्यालाही शिताफीने पकडले. त्यानंतर दोन्ही आरोपींना जाफराबाद येथे आणून अटक करण्यात आली.

पोलिसांनी तांत्रिक तपास, गोपनीय माहिती आणि विविध पथकांच्या समन्वयातून ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली. हत्येत वापरण्यात आलेले शस्त्र व इतर पुराव्यांच्या अनुषंगाने आरोपींकडे सखोल चौकशी सुरू असल्याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली.

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेगबीर सिंग संधू, अप्पर पोलीस अधीक्षक विक्रम साळी यांच्या मार्गदर्शनाखाली, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. नितीन कटेकर, पोलीस निरीक्षक सतीश जाधव, पोलीस उपनिरीक्षक राजधर पठाडे,विजय जाधव,महेश वैद्य, ओमप्रकाश नागरे, संदीप भागीले, तसेच सिंदखेडराजा पोलिसांच्या संयुक्त पथकाने केली.

दरम्यान, चोरीस गेलेल्या बुलेट दुचाकीचा पाठलाग करत असताना झालेल्या हल्ल्यात शेख मोहसीन यांचा मृत्यू झाला होता. या घटनेत त्यांचा पुतण्या शेख साहिल शेख मोबीन गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे जाफराबाद शहरात संतापाची लाट उसळली असून आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

जाफराबाद शहरातील मिरची व्यापारी शेख मोहसीन शेख मजीद (वय ४६) यांच्या निर्घृण हत्येप्रकरणी जाफराबाद पोलिसांनी अवघ्या काही दिवसात संशयित आरोपींना अटक करून तपासाला वेग दिला आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींना न्यायालयासमोर हजर केले

# नामस्मरण हेच कलियुगातील मानवाच्या उद्धाराचे साधन;श्रद्धेने घेतलेले नामच तारणार-रामायणाचार्य ह.भ.प. रामराव ढोक महाराज

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) सतयुगात ध्यान, त्रेतायुगात यज्ञ, द्वापारयुगात पूजा आणि कलियुगात नामस्मरण हेच मुक्तीचे सर्वश्रेष्ठ साधन आहे. जिभेवर भगवंताचे नाम आणि मनामध्ये अढळ श्रद्धा असेल तर मानवाचे जीवन निश्चितच कल्याणाच्या मार्गावर जाते. कलियुग हे नामाचे युग असून श्रद्धेने घेतलेले नामच मानवाला तारणार आहे, असे प्रभावी प्रतिपादन रामायणाचार्य ह.भ.प. रामराव ढोक महाराज यांनी केले.

आष्टी तालुक्यातील बेलगाव येथील ज्येष्ठ शेतकरी नेते, साम्यवादी विचारवंत तथा सामाजिक कार्यकर्ते कै. कॉ. तात्याभाऊ निवृत्ती पोकळे यांच्या प्रथम वर्षश्राद्धानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कीर्तन सेवेत ते बोलत होते. या धार्मिक व स्मृतिसोहळ्याला राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि धार्मिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आमदार सुरेश धस, माजी आमदार भीमराव धोंडे, माजी आमदार साहेबराव दरेकर, सुशीलाताई मोराळे, संत मदन महाराज देवस्थानचे अध्यक्ष ह.भ.प. बबन महाराज बहिरवाल, विजय गोल्हार, डॉ. शिवाजी राऊत, देविदासआबा धस, रामभाऊ खाडे, लालाभाऊ कुमकर, दादासाहेब मुंडे, कॉ. महादेव नागरगोजे, हनुमंत थोरवे, सतीशआबा शिंदे, वाल्मीकतात्या निकाळजे, भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, प्राचार्य डॉ. हरिदास विधाते, उपप्राचार्य डॉ. भास्कर चव्हाण, सुखलाल मुथा, आप्पासाहेब राख, संतोषशेठ मेहेर, बद्रीनाथ जगताप, अमोलराजे तरटे, बाळासाहेब नाईकनवरे, अंकुश चव्हाण, डॉ. मधुकर हंबर्डे, अशोकअण्णा पोकळे, आदिनाथ महाराज दानवे, प्रवीण तरटे महाराज, गोविंद महाराज पवार, प्रफुल्ल सहस्रबुद्धे, उत्तम बोडखे, शरद रेडेकर, प्रवीण पोकळे, राजेंद्र लाड, गजूकाका कुलकर्णी, नवनाथ तांदळे, हौसराव आजबे, नवनाथ आटोळे, हनुमंत शिंदे, सुनील रेडेकर, मारुती भुकन, विक्रम पोकळे, इंजिनिअर प्रवीण वारे, राकेश शाही, निलेश दिवटे, प्रल्हाद पोकळे, शिवलिंग लगड, संजय शिंगवी, बन्सीभाऊ पोकळे, सुखदेव पोकळे, जालिंदर नरवडे, तुकाराम भोसले, अशोक काकडे, ज्ञानेश्वर भवर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कै. कॉ. तात्याभाऊ पोकळे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी आप्पासाहेब राख, वाल्मीकतात्या निकाळजे, विजय गोल्हार, डॉ. शिवाजी राऊत, सतीशआबा शिंदे, दादासाहेब मुंडे, ह.भ.प. बबन महाराज बहिरवाल, शंकर देशमुख, सुशीलाताई मोराळे, कॉ. महादेव नागरगोजे, माजी आमदार भीमराव धोंडे आणि आमदार सुरेश धस यांनी आपल्या भावना व्यक्त करत कै. तात्याभाऊ पोकळे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

कीर्तनातून अध्यात्म, जीवनमूल्ये आणि नाममहिमा यांचे विवेचन करताना रामराव ढोक महाराज म्हणाले की, कलियुगात मोठमोठ्या तपश्चर्या, कठीण साधना किंवा विशेष



कर्मकांडांची आवश्यकता नाही. श्रद्धेने घेतलेले भगवंताचे नाम मानवाला भवसागरातून पार नेण्याचे सामर्थ्य ठेवते. संतांनी म्हणूनच नाम घेता कलीचा त्रास नाही असा संदेश दिला आहे. आजच्या धावपळीच्या, तणावग्रस्त आणि स्पर्धात्मक जीवनात काही क्षण नामस्मरणासाठी दिले तरी मनाला शांती आणि समाधान मिळते.मानवी जीवनाचे तत्त्वज्ञान स्पष्ट करताना त्यांनी अत्यंत समर्पक उदाहरण दिले. ते म्हणाले की, शरीर आणि जीव यांचे नाते घर आणि त्यात राहणाऱ्या पाहुण्यासारखे आहे. जोपर्यंत श्वास आहे तोपर्यंत जीव शरीरात वास करतो. कालांतराने शरीररूपी घर जीर्ण होते, परंतु जीव नवीन घराचा शोध घेतो. त्यामुळे शरीराची योग्य काळजी घेत असतानाच जीवाला नामाची जोड देणे आवश्यक आहे. शरीर नश्वर आहे, पण भगवंताचे नाम अविनाशी आहे.

पुढे ते म्हणाले की, मानवी जीवनात निश्चिंतता प्राप्त होणे हीच खरी आध्यात्मिक संपत्ती आहे. भूतकाळाच्या आठवणींमध्ये किंवा भविष्याच्या चिंतेत अडकून राहू नये. उद्याचे काय होईल?, लोक काय म्हणतील? या विचारांनी मनावर अनावश्यक ओझे निर्माण होते. हव्यास, तृष्णा आणि अपेक्षांचे ओझे बाजूला ठेवून भगवंताच्या नामात रमले तर मनाला खरे समाधान प्राप्त होते. सर्व काही माझ्या हातात नसून विठ्ठलाच्या कृपेवर अवलंबून आहे ही भावना मनात निर्माण झाली की माणूस निश्चिंत होतो. नामस्मरण, चिंतन आणि भक्तीमय जीवनातूनच खऱ्या अर्थाने जीवनाचे सार्थक होते, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी आमदार सुरेश धस यांनी कै. तात्याभाऊ पोकळे यांच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. ते म्हणाले की, ग्रामीण भागात साम्यवादी विचारसरणी रुजविणे सोपे नव्हते. मात्र शेतकरी, शेतमजूर आणि गोरगरिबांच्या हक्कांसाठी शासनाविरोधात निर्भीडपणे आवाज उठविणारे नेते म्हणून तात्याभाऊ पोकळे यांचे नाव आदराने घेतले जाते. त्यांनी आयुष्यभर अन्यायाविरुद्ध संघर्ष केला आणि दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने लढा दिला.माजी आमदार भीमराव धोंडे यांनीही आपल्या आठवणींना उजाळा दिला. ते म्हणाले की, पंचायत समिती सदस्यपदाच्या निवडणुकीत तात्याभाऊ पोकळे यांना विजयी करण्यासाठी त्या काळातील युवकांनी पक्षभेद बाजूला ठेवून प्रयत्न केले होते. त्यांच्या विचारांप्रती असलेला आदर आणि जनसामान्यांमधील लोकप्रियता यामुळेच त्यांना व्यापक पाठिंबा मिळाला. आज त्यांचे सुपुत्र कल्याण पोकळे सार्वजनिक जीवनात कार्यरत असून, आम्ही वेगवेगळ्या राजकीय पक्षांत असलो तरी त्यांना सर्वतोपरी सहकार्य करण्यास सदैव तयार आहोत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

बेलगाव येथे संपन्न झालेला हा वर्षश्राद्ध सोहळा श्रद्धा, अध्यात्म, सामाजिक बांधिलकी आणि कै. तात्याभाऊ पोकळे यांच्या कार्यस्मृतींना उजाळा देणारा ठरला. कीर्तनातून मिळालेला नामस्मरणाचा संदेश आणि मान्यवरांनी व्यक्त केलेल्या आठवणींमुळे उपस्थित भाविक व ग्रामस्थ भारावून गेले. संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.